15-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
RDB/ D/ KTG/ 11:00

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम" या गीताच्या समूह गायनाने झाला.

**मंत्र्यांचा परिचय**

**सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक एक वर मंत्र्यांचा परिचय अशी बाब दाखविण्यात आलेली आहे. परंतु संबंधित मंत्री आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ज्यावेळी संबंधित मंत्री सभागृहात येतील त्यावेळी त्यांचा सभागृहाला परिचय करुन देण्यात येईल.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: लेखी उत्तरे

**राज्यातील शिक्षकांना शिक्षणाव्यतिरिक्त इतर कामे न देण्याबाबत**

**(१) * ४२५२० श्री.दीपकराव साळुंखे-पाटील , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.सतीश चव्हाण , श्री.संदिप बाजोरिया , श्री.हेमंत टकले , श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव , श्री.रमेश शेंडगे , श्री.कपिल पाटील , श्री.संजय पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४१०८ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वत्रिक निवडणुकांची कामे वगळता अन्य कोणतीही शाळाबाह्य कामे शिक्षकांना न देण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१३ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यांत आली आहे काय,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या निर्णयामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी निवडणूक कार्यालयाच्या निरंतर कार्यासाठी व्यग्र असल्याने, विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान भरुन काढण्यासाठी शासनाने पर्यायी व्यवस्था केली आहे काय,
(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (१), (२), (३), (४), (५) व (६) शाळाबाह्य इतर कार्यालयात प्रतिनियुक्तीने किंवा तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत शिक्षकांच्या सेवा नियुक्तीचे मूळ शाळेत वर्ग कराव्यात, सार्वत्रिक निवडणूकीची मतदान प्रक्रिया वगळता इतर प्रयोजनार्थ शिक्षकांच्या सेवा वापरण्यात येवू नयेत या स्वरुपाचे शासन परिपत्रक दिनांक ३ मे, २०१३ रोजी निर्गमित केले होते. दरम्यान बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या तरतुदीनुसार दशवार्षिक जनगणना, नैसर्गिक आपत्ती निवारण कार्य तसेच स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभा निवडणूक प्रक्रियेशी निगडीत सर्व कामे करणे शिक्षकांना बंधनकारक आहे. यास्तव सुस्पष्ट सुधारित परिपत्रक दिनांक २२ मे, २०१३ रोजी निर्गमित केले आहे. त्यामध्ये अधिनियमातील उपरोक्त तरतुदीनुसारच शिक्षकांच्या सेवा शाळाबाह्य कामासाठी वापरता येतील. त्याशिवाय इतर प्रयोजनार्थ कार्यरत शिक्षकांना मूळ शाळेत वर्ग करावे असे स्पष्ट केले आहे. सदर सुधारित परिपत्रकाची अंमलबजावणी सुरु आहे.

श्री. दीपकराव साळुंके : सभापती महोदय, राज्यामध्ये ग्रामीण भागात आणि गरीब मुलांना शिक्षण देण्यासाठी वाड्या, वस्त्या, तांड्यांवर जिल्हा परिषदेमार्फत शाळा उघडलेल्या आहेत. परंतु शैक्षणिक कामापेक्षा या शिक्षकांना इतरच कामेच जास्त दिल्यामुळे त्यांच्या शिकविण्याच्या कामावर

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42520 ...... श्री. दीपकराव साळुंखे ...

मोठा परिणाम होत आहे. उदा. त्यांच्याकडे निवडणुकीची कामे आहेत त्याचबरोबर शालेय पोषण आहार, बांधकामाच्या संदर्भातील कामे ही सर्व शैक्षणिक कामांपेक्षा जास्तीची असलेली कामे आहेत. ती कामे थांबवून शिक्षकांनी शिक्षणाचे काम करण्याचा जो मुख्य हेतू आहे त्याप्रमाणे शिकविण्याचे काम त्यांना दिले जाईल का ? इतर कामे बाजूला काढून शिक्षकांना शिकविण्याच्या दृष्टीने काम देण्यात येईल का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिक्षकांचे काम हे शिकविण्याचेच आहे आणि त्यामुळे त्यांना शाळाबाह्य कामे देण्यात येऊ नयेत या दृष्टीकोनातून 3 मे आणि 22 मे रोजी दोन शासन परिपत्रके निर्गमित केलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितली ती गोष्ट खरी आहे की, अनेक शाळांमध्ये शिक्षक असताना सुध्दा ते शाळाबाह्य कामांसाठी बाहेर फिरत होते आणि त्यामुळे शिक्षणावर परिणाम होत होता. म्हणून आपण हे दोन आदेश निर्गमित केलेले आहेत. शिक्षणाचा अधिकार कायदा, 2009 च्या कलम 27 अन्वये फक्त दशवार्षिक जनगणना, नैसर्गिक आपत्ती निवारण कार्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभा निवडणूक प्रक्रियेशी संबंधित असलेली सर्व कामे, एवढीच कामे आता त्यांच्यावर बंधनकारक आहेत. त्याशिवाय इतर कामे त्यांच्यावर लादता येणार नाहीत.

श्री. निरंजन डावखरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, शिक्षकांना जनगणनेचे काम दिले जाते. या कामासाठी सुशिक्षित बेरोजगारांना इन्व्हॉल्व का करु शकत नाही ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे परंतु मी सांगू इच्छितो की, केंद्र शासनाने आणि भारत सरकारच्या निवडणूक आयोगाने एकत्र बसून घेतलेला हा निर्णय आहे. त्यानंतर सुप्रीम कोर्टामध्ये सुध्दा या बाबतीत शिक्कामोर्तब झालेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42520...

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षकांना दैनंदिन अध्यापनाच्या व्यतिरिक्त अन्य कोणतेही काम न देण्यासंबंधी मंत्री महोदयांना भेटीच्या ठिकाणी आलेल्या अनुभवातून दिनांक 3 मे, 2013 रोजी शासनाने जी.आर.इश्यू केला होता. या निर्णयाबाबत शिक्षकांनीही शासनाचे अभिनंदन केले होते. शिक्षकांना असे वाटले की, आपण इतर कामातून मुक्त झालो आहोत. परंतु पुन्हा दिनांक 22.5.2013 रोजी हा निर्णय बदलण्यात आला. शिक्षकांनी निवडणुकीचे काम टाळलेले नाही. प्रत्यक्ष निवडणुकीचे व जनगणनेचे काम करण्यास आम्ही बांधील आहोत. परंतु निवडणुकीच्या संदर्भातील बीएलओचे कामकाज, घरोघरी जाऊन पासाचे वाटप करणे, फोटोपासचे वाटप करणे, मतदार याद्या दुरुस्त करणे या कामासाठी त्यांना दैनंदिन अध्यापनाचे काम बंद करावे लागते, ही कामे बंद केली जाणार आहेत काय आणि दिनांक 3 मे, 2013 चा निर्णय कायम ठेवला जाणार आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, दिनांक 3 मे, 2013 च्या जी.आर.मध्ये मतदानातील प्रक्रियेचा उल्लेख केला होता. ज्यामध्ये प्रशिक्षण, मतदान व मतमोजणी या तीन गोष्टींचा समावेश केला होता. त्यानंतर भारताच्या निवडणूक आयोगाकडून सामान्य प्रशासन विभागाला एक पत्र आले. त्यात असे नमूद केले होते की, शालेय शिक्षण विभागाने जो जी.आर.इश्यू केलेला आहे त्यामध्ये संविधानाच्या कलम 324(6) च्या माध्यमातून शिक्षकांवर जी जबाबदारी टाकलेली आहे त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यामुळे हा संभ्रम निर्माण झाला होता. हा संभ्रम दूर करण्यासाठी दिनांक 22 मे, 2013 रोजीचे परिपत्रक निर्गमित केलेले आहे. मघाशी मी म्हटल्या प्रमाणे दशवार्षिक जनगणना, नैसर्गिक आपत्ती निवारण कार्य व निवडणूक प्रक्रियेतील सर्व कामे शिक्षकांना करावी लागणार आहेत.

श्री.हेमंत टकले : निवडणूक आयोगाने शालेय शिक्षण विभागाला आदेश दिल्यानंतर शासनाचे त्या आदेशाची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. तीन प्रमुख कामे शिक्षकांनी करणे अनिवार्य केलेले आहे. जनगणना दहा वर्षांनी, लोकसभा, विधानसभेच्या पाच वर्षांनी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्या त्यावेळी होतील. प्रत्येक कामाचा पूर्व इतिहास पाहिला तर किती

2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

ता.प्र.क्र.42520....... श्री.हेमंत टकले.....

शिक्षक अध्यापनाच्या कामापासून दूर होते त्याचा शासनाने शोध घेतला आहे काय आणि त्यांचे वाया गेलेले दिवस, त्यांच्या वार्षिक सुट्टया हा सर्व कालावधी एकत्र करुन अध्यापनाचे वाया गेलेले दिवस भरुन काढण्यासाठी एखादी उपाययोजना शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : ही राष्ट्रीय कर्तव्ये पार पाडत असताना विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यादृष्टीनेही शिक्षक काळजी घेतात. त्यामुळे वेगळी व्यवस्था करण्याची गरज नाही याची मला खात्री आहे. तहसील कार्यालयामध्ये, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या कार्यालयामध्ये, सभापतींचे पी.ए. क्र.3, 2 म्हणून शिक्षक काम करीत असल्यामुळे त्यांचा वेळ जात असल्याचे शासनाच्या लक्षात आले. मी स्वत: उस्मानाबाद जिल्ह्यातील इट येथे गेलो असताना तेथे सर्व पक्षाच्या लोकांनी मला अडवून असे सांगितले की, आमच्याकडे शिक्षक नाहीत. त्याबाबत मी माहिती घेतली असता तेथील शिक्षक गेल्या 3 वर्षांपासून तहसील कार्यालयात काम करीत असल्याचे निदर्शनास आले. म्हणूनच हे परिपत्रक निर्गमित केलेले आहे. मला खात्री आहे की, त्याचा निश्चित उपयोग होईल.

श्री.नागो पुंडलिक गाणार : निवडणुकीचे व मतदार यादीचे काम यामध्ये शासन फरक करणार आहे काय, मतदार यादीच्या कामासाठी जे शिक्षक तहसील कार्यालयात गेल्या 5 वर्षांपासून काम करीत आहेत त्यांना मोकळे केले जाणार का ?

श्री.राजेंद्र दर्डा : पहिल्या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. जे शिक्षक तहसील कार्यालयात 5-5 वर्षांपासून काम करीत होते त्या सर्वांना परत घेण्याचे काम करण्यात आलेले आहे.

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. **पृ.शी./मु.शी.**: मंत्र्यांचा परिचय

**सभापती** : मी एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. कामकाजपत्रिकेवर "वंदे मातरम्" नंतर "मंत्र्याचा परिचय" ही बाब होती. परंतु मघाशी नवीन मंत्री सभागृहामध्ये हजर नसल्यामुळे प्रश्नोत्तराचा तास सुरु करण्यात आला. आता नवीन मंत्री सभागृहामध्ये हजर राहिले आहेत. माननीय उप मुख्यमंत्री त्यांचा परिचय करुन देतील.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. मधुकरराव काशिनाथ पिचड यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. दिलीप गंगाधर सोपल यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. शशिकांत जयवंतराव शिंदे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. सुरेश रामचंद्र धस यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. उदय रवींद्र सामंत यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. संजय वामन सावकारे यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईण्ट ऑफि इन्फॉर्मेशन**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला नवीन मंत्र्यांचा परिचय करुन दिला. आमचे विरोधी पक्षातील सदस्यांचे प्रश्न सुटत नाहीत. परंतु मंत्र्यांचे प्रश्न सुटत नाहीत म्हणून एक मंत्री महोदय त्यांचे मंत्रिपद सोडू इच्छित आहेत. या संदर्भात सदनाला माहिती मिळावी.

**सभापती** : या मुद्याचे उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

श्री. नारायण राणे : प्रश्नोत्तराच्या वेळी अशा प्रकारचे मुद्दे उपस्थित करण्याची संधी दिली जावू नये अशी माझी आपणास विनंती आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विविध जिल्ह्यातील बालके कुपोषणामुळे मृत्युमुखी पडल्याबाबत**

**(२) * ४२६८० श्री.रमेश शेंडगे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.सतीश चव्हाण , ॲड.जयदेव गायकवाड , डॉ.दीपक सावंत , श्री.दिवाकर रावते , श्री.विनायकराव मेटे , श्री.अनिल भोसले , श्री.एम.एम.शेख , श्री.विक्रम काळे , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.दिपकराव साळुंखे-पाटील , श्री.अमरसिंह पंडित , श्री.संजय दत्त , श्री.सुभाष चव्हाण , श्री.जयप्रकाश छाजेड , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.मोहन जोशी , श्री.वसंतराव खोटरे , श्रीमती अलका देसाई , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.नरेंद्र पाटील , श्री.हेमंत टकले , डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७४३८ ला दिनांक १५ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुपोषणग्रस्त भागात माहे एप्रिल, २०१२ ते जानेवारी, २०१३ च्या सुमारास चार हजार बालके मृत्यूमुखी पडल्याची बाब माहे एप्रिल, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान खोज या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ठाणे जिल्ह्यात ६१२, गडचिरोलीत ५६१, नाशिकमध्ये ४४१ दोन वर्षाची बालके तसेच यवतमाळ जिल्ह्यातील ३ हजार बालके मृत्युमुखी पडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुपोषणाला आळा घालण्यासाठी राज्यात चाईल्ड ट्रीटमेंट सेंटर स्थापन करण्यात आली असली तरी वरील सेंटरमध्ये दाखल झालेल्या कुपोषित बालकांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याचे प्रमाण फारच कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व राज्यात कुपोषणाला आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या प्रभावी उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) असल्यास, राज्यातील कुपोषणाची सद्य:स्थिती काय आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही. तथापि, सदरचे बालमृत्यू हे कुपोषणाने झालेले नसून विविध आजारांनी झालेले आहे.

(२) राज्यातील ठाणे, गडचिरोली, नाशिक व यवतमाळ जिल्ह्यातील बालमृत्यूबाबतची सद्य:स्थिती पुढील प्रमाणे आहे.

| जिल्हा | ० ते १ वर्षे बालकांचा मृत्यू | १ ते ६ वर्षे बालकांचा मृत्यू |
|---|---|---|
| ठाणे | ४५१ | १६१ |
| गडचिरोली | ४७५ | ८६ |
| नाशिक | १०२१ | ३२३ |
| यवतमाळ | ५३४ | १८२ |

वरील आकडेवारीवरुन ० ते १ वर्षे वयोगटातील बालमृत्यूची संख्या जास्त दिसून येते. सदर बालमृत्यू हे विविध कारणे व संसर्गजन्य आजारांमुळे उदा. कमी वजनाची मुले, कमी दिवसाची प्रसुती (लवकर प्रसुती), जन्मत: व्यंग, विविध संसर्गजन्य रोग, ॲनिमिया, न्युमोनिया, श्वसनाचे विकार, डायरिया, अपघात, सर्पदंश, श्वानदंश, दमा, जुळी मुले, हृदय विकार, डिसेंट्री, एपिलेप्सी इ. कारणांमुळे झाल्याचे आढळून आले.

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(3) हे खरे नाही.

(4) कुपोषणाला आळा घालण्याकरिता खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

कुपोषणाला आळा घालण्याकरिता राज्यात राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच VCDC/CTC द्वारे कुपोषित बालकांना आवश्यक सुविधा व उपचार पुरविण्यात येऊन कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पूरक पोषण आहाराव्यतिरिक्त अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांना हर्बोझोल सिरप, टोनेक्स आयर्न सिरप, मल्टीव्हिटॅमिन सिरप, स्प्रिंकल्स, मायक्रोन्युट्रीयण्ट चिक्की, नाचणी व आयुर्वेदिक पौष्टिक बिस्किटे इ. पुरविण्यात येत आहेत. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणा-या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमूल्य असणारा आहार पुरविण्यात येत आहे. अंगणवाडीतील बालकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरिता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधण्यात येतो. कुपोषण दूर करण्याकरिता सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे.

(5) राज्यातील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| महिना | एकूण वजन घेतलेली मुले | सर्वसाधारण | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | % |
|---|---|---|---|---|---|
| जाने 2013 | 6288312 | 5550853 | 638128 | 89331 | 1.42 |
| फेब्रु.2013 | 6350293 | 5634514 | 629259 | 86520 | 1.36 |
| मार्च 2013 | 6369175 | 5684968 | 601438 | 82719 | 1.30 |

यावरुन तीव्र कमी वजनाच्या बालकांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते.

...5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : राज्यातील कुपोषणाची परिस्थिती अद्याप भयावह अशीच आहे. मी विचारलेल्या प्रश्न भाग (1) आणि प्रश्न भाग (3)ला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. कमी वजनाची मुले, कमी दिवसाची मुले, विविध संसर्गजन्य रोग, ॲनिमिया, न्युमोनिया, इत्यादी आजार ही बालमृत्यूची कारणे सांगितलेली आहेत. हे सर्व आजार कुपोषणामुळेच होतात. कुपोषण थांबविण्याच्या बाबतीत ज्या ज्या उपाययोजना केल्या पाहिजेत त्या केलेल्या दिसत नाहीत. हे कुपोषण थांबविण्याच्या संदर्भात आएएस दर्जाचा अधिकारी प्रकल्प अधिकारी म्हणून आदिवासी क्षेत्रात नियुक्त करावा असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार आयएएस अधिका-याची नेमणूक केलेली आहे काय ? डॉ. आरोळे आणि डॉ. फर्नांडीस यांच्या अध्यक्षेखाली एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने शासनाला दिलेल्या अहवालाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे काय ? कुपोषणग्रस्त मुलांच्या आणि आदिवासींच्या कल्याणासाठी राज्यातील प्रवाशांकडून तिकिटामागे 10 किंवा 15 पैस जमा केले जातात हे खरे आहे काय, असेल तर राज्यामध्ये एकूण किती पैसे जमा झाले आहेत आणि त्या पैशाचा विनियोग कशा प्रकारे करण्यात येत आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : माननीय सदस्यांनी जो तिसरा प्रश्न विचारला त्याचे उत्तर मी आधी देते. हे पैसे स्थानिक स्वराज्य संस्थेकडून गोळा केले जातात.

बालमृत्यूची जी कारणे नमूद केलेली आहेत ती आम्हाला सार्वजनिक आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार नमूद करण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र हा कुपोषणमुक्त करण्यामध्ये आपण फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केलेले आहेत. मधल्या काळामध्ये युनिसेफचा जो रिपोर्ट आला होता त्यामध्ये हे प्रमाण 8 टक्क्यांनी कमी झाल्याचे दाखविलेले आहे. तसेच केन्द्र शासनाच्या कॅगच्या रिपोर्टमध्ये परफॉर्मन्स ऑडिट ऑफ आयसीडीएस स्कीम, चॅप्टर 6, सप्लिमेण्टरी न्यूट्रिशन यामध्ये देखील महाराष्ट्राचे कौतुक करण्यात आलेले आहे. कुपोषण मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी शासनाने जी मोहीम हाती घेतली त्याबाबतीत नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षांनी देखील राज्याचे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांचे अभिनंदन केलेले आहे. मधल्या काळात कॅनडामधील मायक्रो न्यूट्रियण्ट इन्सेटिव्हचे सीएमजी व्यंकटेश हे जेव्हा मुंबईमध्ये आले होते





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यावेळी त्यांनी महाराष्ट्राचे कौतुक केले होते.. महाराष्ट्र कुपोषण मुक्त होण्यासाठी शासनाचे सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छिते की, जे जे रिपोर्ट आलेले आहेत त्या सर्वांचा अभ्यास करुन पावले उचलली जातील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मी हा प्रश्न उपस्थित केला होता. आम्ही 45 दिवस आधी प्रश्न देतो आणि त्याची खात्यामार्फत नोंद घेतली जाते. या प्रश्नाच्या खाली "उत्तर आले नाही" असे छापलेले आहे. आज या प्रश्नाचे उत्तर वितरित करण्यात आलेले आहे. विभागाकडून कालपर्यंत उत्तर आले असते तर ते छापण्यासाठी गेले असते. आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा केली. प्रशासकीय यंत्रणेला विधिमंडळाच्या कामकाजाचे गांभीर्य नाही असे मी सांगितले होते. त्यावेळी संसदीय कार्य मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, या संदर्भात आम्ही योग्य ती दखल घेऊ. हा विषय गंभीर आहे.

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42680..... श्री.दिवाकर रावते.......

सन्माननीय सदस्य 45 दिवस अगोदर प्रश्न देतात, परंतु संबंधित विभागाकडून त्या प्रश्नांची उत्तरे वेळेवर दिली जात नसतील तर आम्ही 45 दिवस अगोदर प्रश्न कशासाठी विचारावयाचे असा प्रश्न आमच्या मनात निर्माण होतो. शासनाने 20 दिवसापूर्वी प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केलेले आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र शासन अगोदर देऊ शकत होते.

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये या अनुषंगाने चर्चा झाली ही वस्तुस्थिती आहे. विभागाकडून एखाद्या प्रश्नाचे काही वेळेला अपूर्ण उत्तर अथवा चुकीचे उत्तर दिले गेले असेल तर अशा वेळी उत्तर बदलले जाते. आपण म्हणता त्या पध्दतीने या प्रश्नाचे कालपर्यंत उत्तर आले नसेल तर त्याबाबतीत मी स्वत: चौकशी करतो. या बाबतीत संबंधित विभागाकडून संपूर्ण माहिती मागवून घेण्यात येईल व ती माहिती सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : महोदय, राज्य शासनाने न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. खोज संस्थेचे प्रमुख पूर्णिमा उपाध्याय आणि बंडया साने यांनी या बाबतीत न्यायालयात केस दाखल केली होती. या बाबतीत शासनाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. याबाबतत न्यायालयाने शासनास काही सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचनांची अंमलबजावणी नेमकी कधी केली जाणार आहे, न्यायालयाने ज्या सूचना दिल्या त्या सूचना कोणत्या आहेत याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगावी. तसेच मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले की, कुपोषणामध्ये घट झाली आहे, तशा प्रकारचे अहवाल सर्वांनी दिले आहेत. या सर्व गोष्टी बरोबर आहेत. आपण जे प्रेझ ेंटेशन करता, त्या अनुषंगाने अहवाल येतो. आपले प्रेझेंटेशन ग्रास रुटला वेगळे आहे आणि आपण जी माहिती सांगता ती वेगळी आहे. त्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांच्या एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांचा तक्ता आम्हाला उपलब्ध करुन दिलेला आहे, त्यात कुपोषणामध्ये अंशत: घट झालेली आहे. अंशत: घट झालेली असताना लक्षणीय घट झालेली आहे असे आपल्याला म्हणता येणार नाही. अजूनही आपल्या आकडेवारीप्रमाणे 82719 मुले कुपोषित आहेत. या मुलांना सर्वसाधारण श्रेणीमध्ये कधी पर्यंत आणू शकाल ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, कुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय घट आणण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत ही गोष्ट मी सातत्याने सांगत आहे. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती सांगितली ती खरी आहे. जानेवारी, 2013 मध्ये कुपोषणाचे प्रमाण 1.42 टक्के होते, फेब्रुवारी, 2013 मध्ये ते प्रमाण 1.36 टक्के एवढे कमी झाले आहे आणि मार्च, 2013 मध्ये सदर प्रमाण हे 1.30 टक्क्यांपर्यंत आलेले आहे. कुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय घट झालेली नाही ही गोष्ट स्वीकारलेली आहे. परंतु सदरच्या प्रमाणात घट व्हावी यादृष्टीने असा प्रयत्न आम्ही सातत्याने करीत आहोत. कुपोषणाला आळा घालण्यासाठी राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना केलेली आहे. देशात महाराष्ट्र हे एकमेव राज्य असे आहे की, कुपोषणाला आळा घालण्यासाठी मिशनची स्थापना केलेली आहे. पूरक पोषण आहार, समता योजना, इंदिरा गांधी मातृत्व योजना, पाळणाघर योजना, किशोर शक्ती योजना अशा योजनांच्या माध्यमातून कुपोषणासंदर्भात लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो आहे.

डॉ.दीपक सावंत : न्यायालयाने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी कधीपर्यंत करण्यात येणार आहे असा मी प्रश्न विचारलेला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर मला माननीय मंत्री महोदयांकडून हवे आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : न्यायालयाने ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्यांचे पालन निश्चितपणे केले जाईल. सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित सूचना न्यायालयाने दिलेल्या आहेत, त्या सूचनांच्या बाबतीत सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांबरोबर चर्चा केली जाईल. हा प्रश्न सुरुवातीला सार्वजनिक आरोग्य विभागाकडे गेला होता. त्यांच्याकडून तो प्रश्न महिला व बालविकास विभागाकडे आलेला आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांशी न्यायालयाने दिलेल्या सूचनासंदर्भात चर्चा केली जाईल, त्यानंतर सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर निश्चितपणे दिले जाईल.

श्री.विनोद तावडे : केंद्राच्या समितीने महिला व बालविकास विभागाचे कौतुक केले असे माननीय मंत्री महोदयांनी मघाशी सांगितले. माझ्याकडे "Report of the Comptroller and Auditor General of India on General and Social Sector for the year ended March 2012." या मध्ये असे म्हंटले आहे की, "Audit scrutiny revealed that between

3...



ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 11:15



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

March 2008 and January 2011, the department incurred an expenditure of Rs. 13.66 crore on procurement and administration of health supplements to 17,24,839 beneficiaries in 35,135 AWCs (total 200 projects). However, in absence of any facilities (either at CDPOs level or AWCs) to preserve the health supplements at the requisite temperature, it was difficult to quantify the extent to which these supplements were useful in reducing malnourishment among children in the target age group and other beneficiaries such as pregnant women and lactating mothers."

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42680....... श्री.विनोद तावडे.....

मंत्री महोदयांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाचे कौतुक केले आहे. ॲडव्होकेट जनरल यांनी शासनाला उघडे पाडले आहे. नेमकी वस्तुस्थिती काय आहे?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो संदर्भ वाचून दाखविला तो सन 2011-2012 च्या अहवालातील आहे. माझ्याकडे कॅगचा सन 2012-2013 चा अहवाल उपलब्ध आहे. मी सभागृहाला माहिती देऊ इच्छिते की, महाराष्ट्राच्या बाबतीत कॅगच्या 2012-2013 च्या अहवालात जो उल्लेख केलेला आहे त्यात Performance Audit of ICDS Scheme, Chapter 6 नुसार सर्वसाधारण श्रेणीतील बालकांची संख्या 77 टक्के असून तीव्र कमी वजनाच्या बालकांची संख्या 45 टक्क्यावरुन 23 टक्क्यावर आणण्यात आली आहे असे म्हटले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यात काही बदल झाला आहे का?

**सभापती** : विरोधी पक्षनेत्यांकडे या संदर्भातील जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती माझ्याकडे देण्यात यावीत, मी मंत्री महोदयांना लेखी पत्र पाठवितो. जर फरक असेल तर त्यांचे स्पष्टीकरण घेण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, 0 ते 1 वर्ष वयोगटातील बालकांच्या मृत्यूची आकडेवारी उत्तरामध्ये नमूद केलेली आहे. बालमृत्यू झाल्याचे शासनाने मान्य केले आहे. फक्त हे बालमृत्यू कुपोषणामुळे झाले आहेत का हा तांत्रिक मुद्दा आहे. या संदर्भात विविध कारणे दिलेली आहेत. त्यात कमी वजन, लवकर प्रसूती, जन्मत: व्यंग, विविध संसर्गजन्य रोग, ॲनिमिया, न्यूमोनिया, श्वसनाचे विकार, डायरिया, अपघात, संर्पदंश, श्वानदंश, दमा, जुळी मुले, हृदय विकार, डिसेंट्री, एपीलेप्सी अशी कारणे नमूद केली आहेत. 0 ते 1 वयोगटातील बालमृत्यूवर नियंत्रण आणण्यासाठी विभागामार्फत उपाययोजना करण्यात आली आहे का?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून मातृत्व अनुदान योजना, दायी बैठक योजना, स्पेशल न्यू बॉर्न केअर युनिट योजना राबविली जात आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राज्य शासनाने नोडल एजन्सी म्हणून महिला व बालविकास विभागाकडे कुपोषण हा विषय सोपविला आहे. असे असताना कुपोषणाशी संबंधित विषय सार्वजनिक आरोग्य विभागाकडे का पाठविले जातात? महिला व बालविकास विभागाची जबाबदारी असल्यामुळे या विभागाने इतर विभागांशी संपर्क साधून सभागृहाला माहिती दिली पाहिजे.

प्रा.वर्षा गायकवाड : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून कोणकोणत्या योजना राबविल्या जातात हे मी सभागृहाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. मातृत्व अनुदान योजना, दायी बैठक योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजना, जननी सुरक्षा योजना, जननी शुश्रूषा योजना, राजीव गांधी जीवनदायी योजना, स्पेशल न्यू बॉर्न केअर युनिट, व्हीसीडीसी/सीटीसी या माध्यमातून बालमृत्यू आणि अर्बन मृत्यू कमी करण्यासाठी राबविण्यात येत आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाला Neo-natal mortality कमी केल्याबद्दल देशात पहिला क्रमांक मिळाला आहे. Child death कमी केल्याबद्दल दुसरा क्रमांक मिळाला आहे आणि infant mortality (अर्भक मृत्यू) रोखल्याबद्दल तिसऱ्या क्रमांकाने गौरविण्यात आले आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, बालमृत्यू रोखण्यामध्ये प्रगत महाराष्ट्राचा क्रमांक कितवा आहे? 0 ते 1 वर्ष वयोगटातील बालमृत्यूचे प्रमाण नाशिकमध्ये 1021 असून ठाणे व गडचिरोली जिल्हयांच्या तुलनेत हे प्रमाण अडीच पट आहे. यवतमाळ जिल्हयाच्या तुलनेत दुप्पट असल्याचे दिसून येते. 1 ते 6 वर्षे वयोगटातील बालमृत्यूचे प्रमाणे गडचिरोली जिल्हयात 86 असून नाशिक जिल्हयात 323 म्हणजे गडचिरोली जिल्हयाच्या तुलनेत चार पट असल्याचे चित्र मंत्रीमहोदयांनी निदर्शनास आणून दिले आहे. नाशिक जिल्हयातील बालमृत्यूचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने काही विशेष योजना आखली आहे का? प्रश्न क्रमांक-5 च्या संदर्भात महाराष्ट्रात मध्यम कमी वजनाच्या बालकांची संख्या 18 लाखापेक्षा जास्त असल्याची माहिती देण्यात आली आहे. या संदर्भात सरकारची योजना काय आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर एफ.1....

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. नाशिक जिल्हयामध्ये बालमृत्युचे प्रमाण अधिक आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे नाशिक जिल्हयातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल.

सभापती महोदय, कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी राजमाता जिजाऊ मिशन सुरु असून यासंदर्भात आपण पुन्हा राजमाता जिजाऊ कुपोषण मुक्त ग्राम अभियान योजना सुरु केली आहे. यावेळेला आपण राजमाता जिजाऊ माता व बालक पोषण अभियान सुरु केली आहे. बालमृत्यू तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध माध्यमातून शासन काम करीत आहे. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही सूचना असतील त्या सूचनांचा जरुर विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

**सभापती** : या प्रश्नावर जवळ जवळ 16 मिनिटे चर्चा झालेली आहे. या प्रश्नावर कितीही वेळ चर्चा केली तरी ही चर्चा अपूर्ण राहील. त्यामुळे माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी या प्रश्नाच्या संदर्भात संबंधित सन्माननीय सदस्यांना आपल्या दालनात बोलावून हा प्रश्न सोडवण्यासाठी मार्ग काढावा. शेवटी प्रत्येक प्रश्नाला किती वेळ द्यावयाचा यालाही काही मर्यादा असतात.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर स्टीरिओ टाईपच असते.

**सभापती** : या विषयाला न्याय देण्यासाठी मी माझ्या दालनात माननीय मंत्री महोदयांना तसेच संबंधित सदस्यांना बोलावून घेऊन मार्ग काढण्यात येईल.

-----------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना दोन जादा वेतनवाढी देण्याबाबत**

**(३) * ४२५३१ डॉ.सुधीर तांबे , श्री.संजय दत्त , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण , ॲड. निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३६७०१ ला दिनांक १५ मार्च २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन वेतनवाढी देण्याचा शासनाचा धोरणात्मक निर्णय असताना सन २००९-२०१० मध्ये झालेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याच्या वेळी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना वेतनवाढीची रक्कम दुप्पट करण्याचे घोषित करुन शासनाचा तसा निर्णय निर्गमित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन जादा वेतनवाढीचा दर निश्चित करण्याबाबतच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन वेतनवाढीबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री, मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री व प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधी यांनी सन २००६ पासून वारंवार निवेदने देऊनही जादा वेतनवाढी अद्यापपावेतो देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुषंगाने शासनाने शिक्षकांना दोन जादा वेतनवाढी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदरहू वेतनवाढ केव्हापर्यंत मिळणे अपेक्षित आहे,

(६) या प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (१) होय.

(२), (३), (४), (५) व (६) राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत वेतनवाढीचा दर निश्चित करण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे. याबाबत निर्णय झाल्यावर सदरहू दर आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना लागू करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, मागच्या वेळी सुध्दा हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मागच्यावेळी या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आले होते तेच उत्तर यावेळीही देण्यात आलेले आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना अगाऊ वेतनवाढी देण्यासाठी वेतनवाढीचे दर निश्चित करण्याच्या प्रस्तावास मंत्री मंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही किती दिवसात पूर्ण केली जाईल, या प्रस्तावास मान्यता दिल्यास राज्य शासनावर वार्षिक किती आर्थिक बोजा पडणार आहे ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :42531** ......

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक,माध्यमिक तसेच आदिवासी भागातील माध्यमिक शिक्षकांना आदर्श पुरस्कार दिला जात असतो. पूर्वी आदर्श शिक्षकांच्या पुरस्कारासाठी 7,500 रुपये दिले जात होते परंतु दि.13 जून,2011 च्या शासन निर्णयानुसार 10,000 रुपये देण्यात येतात.

सभापती महोदय, सहावा वेतन आयोग 2006 मध्ये लागू झाला होता. सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर राज्य सरकारी अधिकारी/कर्मचाऱ्यांना अगाऊ वेतनवाढ देण्याची जी प्रचलित योजना होती त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार सामान्य प्रशासन विभागाकडे असतो. आपल्याला कल्पना आहे की, सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यासंदर्भात निर्णय घेत असतात व या निर्णयाला कॅबिनेट कमिटी मान्यता देत असते. हा निर्णय जेव्हा लागू होतो तेव्हा हा निर्णय राज्यातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू होत असतो. या विषयाच्या संदर्भात आमचा सातत्याने पाठपुरावा सुरु असून यासंदर्भात अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी केवळ दोनच प्रश्न विचारणार आहे. यासंदर्भात दि. 25 जानेवारी, 2006 चा शासन निर्णय असून 1962-63 पासून राज्यात ही योजना कार्यान्वित आहे. व सन 2006 पासून राज्यातील शिक्षकांना हे पुरस्कार वेतन उपलब्ध करुन दिले जाते. ही योजना शालेय शिक्षण विभागामध्ये तसेच उच्च शिक्षण विभागामध्ये आहे. ही योजना उच्च शिक्षण विभागामध्ये सुरु आहे परंतु राज्य पुरस्काराची योजना शालेय शिक्षण विभागामध्ये सुरु नाही. राज्यातील 1023 शिक्षकांना पुरस्कार मिळालेले आहेत. काही लोकांना हे पुरस्कार मिळाले होते परंतु ते परत घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, उच्च शिक्षण विभागामध्ये पुरस्काराची ही योजना सुरु आहे परंतु शालेय शिक्षण विभागामध्ये ही योजना बंद का आहे ? ज्यांचे पुरस्कार परत घेण्यात आलेले आहे त्यांची लिस्ट मी आपल्याकडे पाठवतो. ज्या शिक्षकांचे पुरस्कार परत घेण्यात आले ते कोणत्या परिपत्रकानुसार परत घेण्यात आलेले तसेच हे पुरस्कार ज्या अधिकाऱ्याने परत घेतले त्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

यानंतर श्री. भारवि....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ D/ KTG/ 11:30

ता.प्र.क्र.42531....

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.वसंत खोटरे यांनी शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांना दोन वेतनवाढी लागू नाही मात्र उच्च तंत्र शिक्षण विभागातील शिक्षकांना दोन वेतनवाढी लागू आहेत अशा प्रकारची माहिती दिलेली आहे. यासंबंधी मी सभागृहाला आश्वासित करू इच्छितो की, दोन्ही विभागाच्या निर्णयामध्ये एकवाक्यता आणण्यासंबंधी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल. मी सन्माननीय सदस्य प्रा.वसंत खोटरे यांना विनंती करतो की, त्यांच्याकडे असलेली यादी त्यांनी माननीय सभापती महोदय यांच्या मार्फत माझ्याकडे पाठवून दिल्यास उचित निर्णय घेण्यात येईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील आम्ही हा प्रश्न उपस्थित केला होता. प्रत्येक वेळी आम्हाला हेच उत्तर देण्यात येते की, वेतन निश्चिती करण्याच्या प्रस्तावाचे काम सुरू आहे. दोन वेतनवाढी देण्यासंबंधीचा नियम आहे. सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर दोन वर्ष आपण वेतनवाढ देत होतो. सन्माननीय सदस्य प्रा.वसंत खोटरे यांनी सांगितले ते खरे आहे. शासनाने आमच्या जिल्ह्यातील शिक्षकांना रिकव्हरीचे पत्र पाठविले आहे. प्रगत महाराष्ट्रामध्ये प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात आलेली वेतनवाढ परत घेणे हे शोभनीय आहे काय ? आपण प्रोत्साहनासाठी दिलेल्या दोन वेतनवाढी परत कराव्या अशा आशयाचे पत्र शिक्षक कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहे. तेव्हा ज्या अधिकाऱ्याने असे पत्र दिले आहे त्या अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार आहे काय असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन वेतनवाढी देण्याची योजना कार्यरत आहे. यासंबंधी सामान्य प्रशासन विभागाने अद्यापि कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे हा विषय कॅबिनेट समोर आला नसल्यामुळे थोडासा वेळ लागलेला आहे. परंतु मी, सभागृहाला सांगू इच्छितो की, यासंबंधी दोन महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य प्रा.वसंत खोटरे यांनी यादी पाठविली आहे. ती तपासून त्यावर उचित निर्णय घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, येथे वेगळा प्रश्न आहे. वाढीव वेतनवाढ देण्यासंबंधीचा विषय कॅबिनेट समोर गेलेला आहे. मूळ दोन वेतनवाढी द्यायच्या होत्या तो निर्णय आजही कायम आहे. त्याला वित्त व सामान्य प्रशासन विभागांनी स्थगिती दिली आहे काय, नसल्यास, मागील वेतनवाढ कर्मचाऱ्यांना देण्यात येईल काय ?

15-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42531....

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी या अगोदरच सांगितले आहे की, शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढी देण्याची राज्य शासनाची योजना कार्यरत आहे. ती कशा पद्धतीने देण्यात यावी यासंबंधी विचारविनियम सुरू आहे. ज्यावेळी नवीन वेतन आयोग लागू होतो त्यावेळी वेतनवाढ देण्यासंबंधीच्या पद्धतीमध्ये बदल होतो. असे असले तरी वेतनवाढ देण्यासंबंधी आजही आमचा विभाग ठाम आहे. सदर वेतनवाढ कशा पद्धतीने लागू करावयाची याबद्दलचा अंतिम निर्णय व्हावयाचा आहे. सदर निर्णय देखील शिक्षकांच्या बाजूने होईल. त्यामुळे याबद्दल आपण चिंता करू नये.

**सभापती** : या प्रश्नावर सर्व गुरूजन सदस्यांनी बोलावयाचे ठरविले तर सभागृहातील इतर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी मिळण्याची शक्यता नाही असे मला वाटते. सदर बाब सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांच्याकडे विचारार्थ पाठविली आहे अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता सभागृहात माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी उत्तर देताना "कॅबिनेट" असा उल्लेख केला आहे. त्यांनी या पुढे "कॅबिनेट" या ऐवजी "मंत्रिमंडळ" असा उल्लेख करावा अशी मी आपल्या मार्फत त्यांना विनंती करीत आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या पुढे मी मंत्रिमंडळ असा उल्लेख करेन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यासंबंधीचे नॉर्म्स काय आहेत, आदर्श शिक्षक कोणाला म्हणावयाचे, त्याची नियमावली आहे काय ? ज्या शाळेचा शून्य टक्के निकाल लागतो त्या शाळेतील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिलेला आहे. तेव्हा यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केला पाहिजे. माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा हे थेट विधान सभेवर निवडून आले आहेत. मी स्वत: ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि मग विधान परिषदेवर निवडून आलो आहे. त्यामुळे हे पुरस्कार कसे दिले जातात ते मला माहीत आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम आहेत. या नियमानुसार शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याला मुख्यालयी राहण्याचे बंधन आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि... 11:35

ता.प्र.क्र. 42531.....

श्री. जयंत प्र.पाटील....

आमच्या लहानपणी आम्ही शिक्षक गावातच राहत असल्याचे पाहत होतो. ते गावातच राहून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करीत होते. माझा प्रश्न आहे की, मुख्यालयी राहणाऱ्या शिक्षकांनाच आदर्श शिक्षकाचा पुरस्कार देण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अत्यंत मूलभूत प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. आदर्श शिक्षकासंबंधीचे निकष ठरविताना त्यांनी केलेली सूचना निश्चितपणे विचारात घेण्यात येईल. तसेच या सूचने संदर्भात सर्व शिक्षक आमदार तसेच पदवीधर शिक्षक आमदार यांच्याशी एकत्रितपणे चर्चा करुन त्यातून निश्चितपणे मार्ग काढण्यात येईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, शिक्षकांना आगाऊ वेतनवाढी दिल्यामुळे किती वित्तीय भार पडणार आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिक्षकांना आगाऊ वेतनवाढी कशा पध्दतीने द्यायची हे ठरल्यानंतर किती रक्कम अपेक्षित आहे समजेल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना दोन मुद्दे सांगितले. पहिला मुद्दा म्हणजे शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ कशा पध्दतीने द्यावी याचा निर्णय व्हावयाचा आहे. दुसरा मुद्दा म्हणजे हकीम समितीच्या अहवालात स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना वार्षिक तीन टक्के वेतनवाढ द्यावी आणि शिक्षकांना चार टक्के द्यावी आणि हे राज्य शासनाने स्वीकारलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सामान्य प्रशासन विभागाचा उल्लेख केला. मी सामान्य प्रशासन विभागाशी पत्रव्यवहार केलेला आहे. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 6 जानेवारी, 2010 रोजी मला कळविले की, "राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढी व गोपनीय अहवालातील प्रतवारीनुसार द्यावयाच्या दोन आगाऊ वेतनवाढी हे दोन स्वतंत्र विषय आहेत. राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढी देण्याचा विषय हा शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांच्याशी संबंधित असल्याने या प्रकरणी त्या विभागाकडून स्पष्टपणे निर्णय घेणे अपेक्षित आहे. या विषयाशी आमचा काही संबंध नाही." तसेच हकीम समितीने देखील तशा सूचना केलेल्या आहेत. तेव्हा या संदर्भात तातडीने एक महिन्यात त्याची अंमलबजावणी करणार काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42531.....

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे हकीम समितीचा उल्लेख केला. मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, सामान्य प्रशासन विभागाने शिक्षण विभागास कळविलेले आहे. आम्ही त्या संदर्भात आमचे मत अंतिम करीत आहोत आणि ते मत मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येईल. या प्रकरणी दोन महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

--------

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील सर्व क्षेत्रातील कामगारांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणण्याबाबत**

**(4) * 42271 श्री.किरण पावसकर , श्री.दीपकराव साळुंखे-पाटील , श्री.अनिल भोसले , श्री.नरेंद्र पाटील , श्री.संदीप बाजोरिया , श्री.हेमंत टकले , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.सतीश चव्हाण , श्री.रमेश शेंडगे , श्री.दिवाकर रावते , डॉ.दीपक सावंत , श्री.विनायक राऊत** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील आयटी कंपन्या, मॉल, सेझ, सीप्झ यामध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षितता वाटावी यासाठी या सर्व क्षेत्रातील कामगारांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(3) असल्यास, त्या अनुषंगाने निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(4) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ**, : (1), (2), (3) व (4)

आयटी कंपन्या, मॉल, सेझ यांना किमान वेतन अधिनियम, कंत्राटी कामगार अधिनियम इत्यादी कामगार अधिनियम लागू आहेत. सेझ, सीप्झ येथील कामगार कायद्यांच्या तरतुदीबाबत विकास आयुक्त (सेझ) यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे या सर्व क्षेत्रातील कामगार पूर्वीपासूनच कामगार कायद्याच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने येथील कामगारांना कामगार कायद्यांच्या कक्षेत आणण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लेखी उत्तरामध्ये सुधारणा करु इच्छितो.

लेखी उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये प्रश्न उद्‌भवत नाही या नंतर "परंतु, राज्य शासनाने विविध कामगार कायद्याची अंमलबजावणीचे अधिकार 2002-2003 मध्ये विकास आयुक्त, सेझ यांना देण्यात आले आहेत." असे वाचावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, राज्यातील सर्व क्षेत्रातील कामगारांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणण्याचा हा विषय आहे. राज्यामध्ये उद्योगांना चालना मिळाली पाहिजे. राज्यात नवीन उद्योगधंदे आले पाहिजेत म्हणून आपण एसईझेड, आय.टी., सीप्झ, मॉल या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना या कायद्यातून मुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42271.....

श्री.किरण पावसकर..

कामगारांमध्ये नोकरी विषयक असुरक्षितता आहे. हा प्रश्न फक्त ठराविक कामगारांपुरता मर्यादित नाही. खाजगी किंवा सरकारी आय.टी.क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या साडेतीन लाख आहे. सेझमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या दोन ते अडीच लाख आहे. एअर-पोर्ट विभागात काम करणाऱ्या कामगारांची संख्या एक ते दीड लाख आहे. अशाप्रकार जवळपास आठ ते दहा लाख कामगार कंत्राटी पध्दतीवर काम करीत आहेत. त्यांना केव्हाही कामावर ठेवले जाते आणि केव्हाही कामावरुन काढले जाते. कंत्राटदाराचा ठेका काढून घेतल्यास त्याच्याकडे काम करणाऱ्या कामगारांना काढून टाकले जाते असा आपल्याकडे कायदा आहे.

सभापती महोदय, एअरपोर्टवर काम करणाऱ्या कामगारांच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या दालनात एक बैठक झाली होती. सर्व कंत्राटदार त्या बैठक्‍ीला हजर होते. जवळपास दीड लाख कामगार त्यांच्याकडे काम करीत आहेत. ही बैठक झाल्यानंतर त्या कंत्राटदारांनी मला सांगितले की, "माननीय मंत्री महोदय आम्हाला अशाप्रकारे बैठकीला बोलवू शकत नाही."

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 11:40

ता.प्र.क्र.42271....

श्री.किरण पावसकर....

त्यांना कायद्यामध्ये समाविष्ट केले काय ? मुंबई दुकाने व आस्थापने अधिनियम 1948 अंतर्गत मॉल्स व तत्सम क्षेत्रे येत असतील तर त्या ठिकाणी हाऊस किपींग आणि इतर काम करणारे कामगार त्यापासून वंचित का आहेत ? या कामगारांना कंत्राटी कामगार नियमन व निर्मूलन कायदा 1970 लागू होत असेल तर त्या ठिकाणी त्या बाबतची अंमलबजावणी केली जाते काय, सीप्झमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आपण युनियन बनवू शकत नाही. तसेच त्या आस्थापनेच्या अधिकाऱ्यांना आयुक्तांकडे बोलाविले तर आम्ही केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहोत असे ते सांगत असतील तर ते कितपत योग्य आहे, आपला कामगार कायदा अधिक्षेत्रात येत असेल तर या गोष्टी त्यामध्ये येणार आहेत काय, जर येणार नसतील तर या कायद्यामध्ये सुधारणा करुन त्या कायद्याची कठोर अंमलबजावणी करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, हे खरे आहे की, आयटी, ज्वेलरी, सेझ आणि सीप्झ या ठिकाणच्या नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळावे, उद्योगधंद्यांना चालना मिळावी तसेच जे 100 टक्के निर्यात क्षेत्र आहे त्यासाठी केंद्र सरकारने कायदा केला आहे. राज्य सरकारने 2003 मध्ये नोटीफिकेशन काढून सेझच्या विकास आयुक्तांना आपले अधिकार दिले आहेत. कॉन्ट्रॅक्ट लेबर बाबत दुरुस्ती करुन आपण कायदा केला आहे. त्या अंतर्गत प्रिंसीपल एम्प्लॉयरला नोंदणी प्रमाणपत्राची अट काढून टाकली. तसेच कॉन्ट्रॅक्टरला आर.सी. द्यायची अट काढून टाकली त्यामुळे या क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर कॉन्ट्रॅक्ट लेबर आले नाही. परंतु केंद्र सरकार आणि राज्य सरकारने समजून उमजून हे केले आहे. या उद्योगांना 100 टक्के निर्यातभिमुख चालना देण्यासाठी हे केले आहे. आयटी क्षेत्रातील शॉप ॲक्टमध्ये दुकाने कधी सुरु ठेवावीत या बाबत आपल्या कायद्यामध्ये दुरुस्ती केली आहे. त्या व्यतिरिक्त सर्व कायदे या सर्व उद्योगांना लागू आहेत.

ॲड.आशिष शेलार : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी 10 लाख कर्मचाऱ्यांच्या व्यथेबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे. सेझ, आयटी आणि मॉल्स असे तीन सेक्टर असून, मुंबई शहरामध्ये मॉल्सची परिस्थिती फार भयानक आहे. मी मुख्यत: आयटी आणि सेझ बाबत बोलणार आहे. सेझ बाबत नवीन औद्योगिक धोरण केले, त्यामध्ये रेसिडेन्शीयल लँड वाढवली व नंतर ते धोरण बदलले. या निमित्ताने मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, कर्मचाऱ्यांच्या





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42271....

ॲड.आशिष शेलार....

डेफिनेशमध्ये कामगाराचे धोरण बदलणार आहात काय ? शॉप अँड एस्टॅब्लीशमेंट ॲक्टमधील एस्टॅब्लीशमेंटच्या डेफिनेशनमध्ये त्यात काम करणारा एखादा कामगार हा ॲज पर दि लेबर लॉ कर्मचारी मानला जातो. त्यानुसार या क्षेत्रातील कामगारांना कर्मचारी गृहीत धरणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : आपल्याकडे एकूण 12 कामगार कायदे आहेत. त्यामध्ये काही प्रमाणात सूट दिली आहे. कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्टमध्ये आपण सूट दिली. तसेच शॉप ॲक्टमध्ये आयटी क्षेत्राला सूट दिली आहे. बाकीच्या ठिकाणी या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करीत आहोत. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने समजून उमजून कायद्याची अंमबजावणी सुरु केली आहे. सर्व क्षेत्रासाठी या कायद्याची अंमलबजावणी करावयाची झाल्यास हा विषय तपासून त्या बाबत आम्ही पुन्हा विचार करु.

श्री.भाई जगताप : महोदय, हा प्रश्न अधिक गंभीर असून कष्टकऱ्यांच्या आणि राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. माननीय मंत्री या प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, आपण याच चेअरवरुन या विषयी निदेश दिले होते. हा प्रश्न या ठिकाणी पहिल्यांदाच चर्चेला आलेला नाही. मी विधानसभेत होतो तेव्हापासून म्हणजेच गेल्या 10 वर्षांपासून या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. दोन्ही सभागृहात या विषयी अनेक वेळा प्रश्न विचारले गेले आहेत. परंतु प्रत्येक वेळी या प्रश्नाला एका चौकटीत उत्तर मिळत आहे. कॉन्ट्रॅक्ट ॲब्युलेशन ॲक्ट-1970 हे एक मोठे आयुध आपल्या हातात आहे. सदरहू कायद्याचा वापर करुन आतापर्यंत किती कंत्राटदार कामगारांना रद्द करुन त्यांना कायमस्वरुपी नोकऱ्या दिल्या ?

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42271...... श्री. भाई जगताप ....

दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, सेझ असेल किंवा सिप्झ किंवा मॉल्स असतील त्यांच्या बाबतीत वेगवेगळे कायदे आहेत, हे म्हणणे बरोबर आहे. पण नोकरीची हमी त्याच बरोबर नोकरीची सुरक्षा कोठे आहे ? आपले अधिकार त्या अधिकाऱ्याला दिले आहेत असे उत्तरात म्हटले असले तरी ते अधिकार सरकार आपल्याकडे घेऊ शकते. त्यांना आपण नोकरीची हमी द्यावी. आम्ही दुसरे काही मागत नाही. कष्टकऱ्यांना त्यांच्या नोकरीची हमी द्यावी, त्यांच्या नोकरीची सुरक्षा द्यावी अशा दोन गोष्टी आम्ही वारंवार आपल्याकडे मागत आहोत. त्या बाबतीत शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जो पहिला प्रश्न कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲबॉलिशन कायद्याच्या अनुषंगाने विचारला. त्यानुसार किती कामगार तसेच किती मालक आहेत याची यादी पटलावर ठेवण्यात येईल. कारण आज ती माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. आज जो विषय होता त्यामध्ये सेझ, आय.टी., सिप्झमध्ये या कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, राज्य शासनाने दिलेले अधिकार काढून घेण्यासंबंधीची बाब तपासून निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, ते अधिकार आपल्याकडे घेऊ असे मंत्री महोदय म्हणत आहेत त्याचे मी स्वागत करतो. देशामध्ये असा कायदा कोठेही नाही पण आपल्या राज्यात हा कायदा आहे. एमआरटीयू ॲक्ट फक्त आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये आहे. त्यामुळे कष्टकरी कामगारांचे रक्षण युनियनच्या माध्यमातून झालेले आहे. अशाच प्रकारे एमआरटीयूच्या धर्तीवर तथाकथित असंघटित सेक्टरसाठी राज्याचा एखादा वेगळा कायदा करुन या सर्व विभागाला सुरक्षा प्राप्त करुन देणार आहात का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, केंद्र शासनाने सामाजिक सुरक्षा कायदा मान्य केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते राज्य शासनाच्या मनात आहे. ताबडतोबीने ही बाब मंत्रिमंडळासमोर आणून अशा प्रकारचा कायदा करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, या राज्यामध्ये कामगारांची संख्या कोट्यवधी आहे. मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले आहे त्यामध्ये सेझ, सिप्झ आणि मॉल्स यामध्ये विशेषत: सेझ मध्ये आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत असे उत्तर दिलेले आहे. मुळात सेझमध्ये कामगार

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कायदा लागू आहे की नाही ? यामध्ये अधिकार देण्याचा विषय नाही. प्रश्न कामगार खात्याचा आहे. सेझचा कायदा कामगार खात्याचा आहे हे विसरता येणार नाही. त्या ठिकाणी कामगार कायदा लागू आहे की नाही ? दुसरी बाब अशी की, कामगार कायद्यांतर्गत कामगारांना कोठेही न्याय मिळत नाही. मंत्री महोदयांनी बैठक बोलविली तर त्या बैठकीला मालक तसेच मॅनेजमेंटचे लोक येत नाहीत. घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होत नाही. हे कायदे पूर्णपणे निरर्थक झालेले आहेत. त्यामुळे कामगार कायद्यात कठोर बदल करुन अंमलबजावणी करण्याकरिता कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याचा शासनाचा विचार आहे का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सेझ, सिप्झ या ठिकाणी कामगार कायदा पूर्णपणे लागू आहे. फक्त राज्य शासनाने दोनच ठिकाणी बदल केलेले आहेत आणि ते सुध्दा केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे केलेले आहेत. एक बदल असा केला आहे की, कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲबॉलिशन ॲक्ट यामधील दोन अटी दूर केलेल्या आहेत. एक म्हणजे प्रिन्सीपल एम्प्लायमेंटला नोंदणी प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. कंत्राटदाराला रजिस्ट्रेशन घेण्याची अट नाही. शॉप ॲक्टमध्ये काही दुरुस्त्या केल्या आणि या दोन अटी सोडल्या तर सर्व कायदे या क्षेत्राला लागू आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे विधानसभेमध्ये या बाबतीत व्यापक चर्चा झाली होती. त्यावेळी एक समिती करुन नव्याने येणाऱ्या ज्या समस्या आहेत त्या बाबतीत नवीन कायदा राज्य शासन आणणार आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, ॲबॉलिशन ऑफ कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट आणि शॉप इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट आहेत पण त्या कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी होत नाही त्या विषयी आपण वारंवार बोलतो. त्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे ? कामगारांचे बँक अकाऊंट उघडून हे ठेकेदार त्यांच्या बँकेमध्ये पैसे पाठवतील असे ठरले होते. किती कंत्राटदार अशा पध्दतीने पैसे पाठवितात ? जास्त पगार दाखविला जातो आणि कमी दिला जातो. त्यासाठी कामगारांचे बँक अकाऊंट उघडून त्यामध्ये डायरेक्ट त्यांचा पगार जमा करण्याविषयी शासन कठोर कारवाई करणार आहे का ?

यानंतर श्री. खंदारे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42271....

श्री.हसन मुश्रीफ : ज्यांचे वेतन 3 हजार रुपयांपेक्षा जास्त आहे तसेच घरभाडे भत्ता व बोनसची रक्कम 3 हजारापेक्षा जास्त असेल ती रक्कम धनादेशाद्वारेच कामगारांच्या खात्यावर जमा करावी असा कायदा आहे. हा कायदा मोडणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : रोजंदारीच्या कामगारांना 6 हजार वेतन दिले जाते. परंतु मंत्री महोदयांनी असे सांगितले की, घरभाडे भत्ता, बोनस आणि वेतन यांची रक्कम 3 हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तर ती रक्कम धनादेशाद्वारे कामगारांच्या खात्यामध्ये जमा करण्याचा कायदा आहे.

श्री.हसन मुश्रीफ : ज्या कामगारांचे वेतन 3 हजार रुपयांपेक्षा जास्त आहे तसेच घरभाडे व बोनसची रक्कम 3 हजार रुपयांपेक्षा अधिक आहे अशी रक्कम धनादेशाद्वारे कामगारांच्या खात्यात जमा करावी असा राज्याचा कायदा आहे.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, विधानसभेमध्ये कामगारांच्या प्रश्नाविषयी व्यापक चर्चा केलेली आहे. या सभागृहातही या क्षेत्रात अनेक वर्षे काम करणारे अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत. कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याचा हा विषय आहे. त्यामुळे या क्षेत्रातील या सभागृहातील सन्माननीय सदस्यांबरोबर देखील आपण व्यापक चर्चा करावी आणि याबाबत अधिक चांगली कायदेशीर तरतूद करण्याचा प्रयत्न करावा.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. मंत्री महोदय सभागृहात कायद्यांची माहिती सांगत आहेत. आपल्या राज्यात कामगारांसंबंधी अनेक कायदे आहेत, परंतु त्यांची अंमलबजावणी होत नाही. असा आमचा मुद्दा आहे. आम्ही देखील या क्षेत्रात गेली 25 वर्षे काम करीत आहोत. त्यामुळे आम्हाला देखील या कायद्यांची कल्पना आहे. सध्याच्या कायद्यातील तरतुदी अधिक व्यापक व चांगल्या करणे आवश्यक आहे. 3 हजारापेक्षा अधिक असलेली रक्कम धनादेशाद्वारे कामगारांच्या खात्यात जमा होईल. परंतु अशा प्रकारे किती आस्थापना कामगारांच्या खात्यात रक्कमा डायरेक्ट जमा करतात त्याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

-----

2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माथाडी कामगारांनी केलेल्या कामाची मजुरी शेतकऱ्यांनी व लेव्ही व्यापाऱ्यांनी लेव्ही नाशिक बोर्डात जमा करण्याबाबत**

**(५) * ४२४५३ श्री.नरेंद्र पाटील , श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागातर्फे दिनांक १२ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या परिपत्रकानुसार माथाडी कामगारांनी केलेल्या कामाची मजुरी शेतकऱ्यांनी व लेव्ही व्यापाऱ्यांनी बोर्डात अदा केली पाहिजे असे असताना नाशिक जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी मजुरी सुमारे चार वर्षे लेव्ही बोर्डात जमा केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) माथाडी कामगारांनी केलेल्या कामाची मजुरी शेतकऱ्यांनी तसेच लेव्ही व्यापाऱ्यांनी लेव्ही नाशिक बोर्डात जमा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ** : (१) हे खरे आहे.

(२) शेतकऱ्याने विक्रीसाठी आणलेल्या शेत मालावर हमाली व तोलाईवरील लेव्हीची रक्कम खरेदीदारांकडून घेऊन आडत्यामार्फत संबंधित माथाडी मंडळात जमा करण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक १२/११/२००८ रोजीच्या शासन निर्णयास विरोध दर्शवून नाशिक जिल्ह्यातील सर्व व्यापारी व खरेदीदार यांनी लेव्हीची रक्कम माथाडी मंडळात भरणे बंद केले आहे.

(3) दि.12/11/2008 रोजीच्या शासन निर्णयानुसार लेव्ही न भरणाऱ्या सुमारे 550 व्यापाऱ्यांकडून लेव्ही वसुलीसाठी मंडळाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यामार्फत वसुली दावे दाखल केले होते. तथापि, सदर शासन निर्णयाविरोधात नाशिक जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी प्रथम मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्या. परंतु याचिकादारांची विचाराधीन बाब मा. न्यायालयाच्या कक्षेतील नसल्यामुळे, मा.न्यायालयाने दि. 18/01/2010 रोजीच्या न्याय-निर्णयाव्दारे याचिका फेटाळल्या व याचिकादारांना सिव्हिल सूट दाखल करण्यास मुभा दिली. त्यानंतर याचिकादारांनी मा.उच्चस्तर दिवाणी न्यायालय, निफाड येथे विविध याचिका दाखल करुन लेव्ही वसुलीस तूर्तातूर्त मनाई हुकूम प्राप्त केला आहे. त्या विरोधात शासनाच्या वतीने मा.जिल्हा न्यायालय, निफाड येथे दि. 12/6/2013 रोजी अपील दाखल केले असून त्याची पुढील सुनावणी दि. 19/7/2013 रोजी ठेवण्यात आलेली आहे.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या पट्टीतून लेव्हीची कपात होऊ नये असा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने निर्णय दिलेला आहे. तरीही पणन सचिवांनी लेव्हीची कपात व्यापाऱ्यांकडून वसूल करावी असा करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये अंमलबजावणी होत आहे. परंतु नाशिक जिल्ह्यातील कांदा व बटाटाच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. दिनांक 12.11.2008 रोजी याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेव्हापासून लेव्हीची रक्कम जवळजवळ 20 कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे.  अशा परिस्थितीत माथाडी मंडळे चालविणे फार धोक्याचे झालेले आहे.  त्याचप्रमाणे त्या कामगारांना भविष्य निर्वाह निधी, ग्रॅज्युईटी, बोनस व रजेचा पगार अशा सर्व गोष्टींपासून वंचित राहावे लागत आहे.

श्री.दिवाकर रावते : न्यायप्रविष्ट बाब असल्यामुळे येथे चर्चा करता येत नाही.  उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली व दिवाणी न्यायालयात याचिकाकर्त्यांना जाण्यास सांगितले होते.  ते त्या न्यायालयात गेल्यानंतर स्थगिती मिळालेली आहे.  न्यायालयीन बाबीवर सभागृहात चर्चा होऊ शकते काय असा माझा गंभीर मुद्दा आहे.

श्री.नरेंद्र पाटील : या संदर्भात सर्व व्यापारी न्यायालयात गेलेले नाहीत.  प्रमुख व्यापारी न्यायालयात गेले त्यांच्याबाबत मी बोलत नाही.  परंतु बाकीचे व्यापारी आहेत, ज्यांच्याकडून माथाडी मंडळे मजुरी, लेव्ही कायदेशीरपणे वसूल करु शकतात.

**सभापती** : या प्रश्नाच्या लेखी उत्तरातील ठराविक भागासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे.  एखादी बाब न्यायप्रविष्ट असेल तर त्याची चर्चा या सभागृहात होऊ नये अशा प्रकारचा निर्णय यापूर्वी देण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने मंत्री महोदयांनी याबाबतची वस्तुस्थिती सभागृहाला सांगावी.

श्री.हसन मुश्रीफ : 2008 साली मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शेतकऱ्यांच्या मालाच्या विक्रीतून शेतकऱ्यांकडून माथाडी मंडळाची लेव्ही कपात करु नये असा आदेश दिला.  त्यामुळे लेव्हीची रक्कम कोणी द्यावयाची असा प्रश्न निर्माण झाला होता.  शेतकरी आपला माल अडत्याकडे देतो.  अडत्या खरेदीदाराकडून वसूल करतो.  खरेदीदाराकडून अडत्यांनी ही रक्कम वसूल करावी ती लेव्हीची रक्कम माथाडी मंडळाकडे भरावी असे ठरविण्यात आले होते. यासंबंधी उच्च न्यायालयाने निर्णय दिला त्यावेळी सर्व व्यापारी पुन्हा कोर्टामध्ये गेले.  कोर्टाने असे सांगितले की, आम्ही यामध्ये हस्तक्षेप करणार नाही, व्यापाऱ्यांनी खालच्या स्तरावरील कोर्टात जावे. त्याप्रमाणे ते व्यापारी त्या कोर्टात गेल्यानंतर कोर्टाने स्थगिती दिलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 11:55

ता.प्र.क्र.42453.. श्री. हसन मुश्रीफ...

नाशिक बाजार समितीमध्ये विशिष्ट परिस्थिती उद्‌भवलेली आहे. यामधून मार्ग काढला पाहिजे. लेव्ही वसूल होत नसल्यामुळे कामगारांवर अन्याय होत आहे. अध्यादेशाला न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. हे प्रकरण 19-7-2013 रोजी न्यायालयापुढे येणार आहे. त्यावेळी चांगल्यातला चांगला वकील देऊन स्थगिती उठविण्याचा प्रयत्न केला जाईल. घाम गाळणा-या कामगारांना न्याय दिला जाईल.

**सभापती** : ही बाब न्यायप्रविष्ट आहे असे समजायचे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : होय. ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

**सभापती** : सदनामध्ये चर्चा करताना न्यायप्रविष्ट विषय टाळावा असे पूर्वीचे संकेत आहेत आणि निर्णय देखील आहेत.

श्री. भाई जगताप : हे खरे आहे की ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे आपण त्यावर चर्चा करता कामा नये. लेव्ही वसूल करणे हा राज्य शासनाच्या अखत्यारितील प्रश्न आहे. प्रश्नातील "लेव्ही" हा विषय वेगळा आहे. 2008मध्ये झालेल्या प्रक्रियेच्या संदर्भात शासन 2013साली वकील देत आहे. शासन चांगला वकील देईल हा भाग वेगळा. लेव्हीचा प्रश्न हा राज्य शासनाच्या अखत्यारितील आहे. नियमित लेव्ही वसूल करणे हा राज्य शासनाचा अधिकार आहे. व्यापा-यांनी 4 वर्षे माथाडी कामगारांची मजुरी लेव्ही बोर्डात जमा केलेली नाही. ही लेव्ही वसूल करण्याच्या संदर्भात शासनाकडून पावले उचलली जातील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : औरंगाबाद खंडपीठाने असा निर्णय दिला की शेतक-यांकडून लेव्ही वसूल करु नये. श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती. त्या कमिटीने कशा पध्दतीने लेव्ही गोळा करावी यासंबंधी अहवाल दिला. त्यानुसार अध्यादेश काढण्यात आला आणि त्या अध्यादेशाला स्थगिती देण्यात आली. या संबंधी जुलैमध्ये निर्णय होईल.

श्री. हेमंत टकले : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, काही व्यापारी कोर्टात गेले आहेत. सर्वच कोर्टात गेले नाहीत. जे कोर्टात गेले आहेत त्या बाबतीत स्थगित देण्यात आलेली आहे. परंतु जे कोर्टात गेले नाहीत त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी चर्चा करता येईल की नाही ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना माहीत आहे की, नाशिकची बाजार समिती बंद आहे. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. एकदा तर कांद्याचा प्रश्न निर्माण झाला होता. या प्रकरणी जुलै महिन्यामध्ये निकाल लागेल आणि लेव्हीचा प्रश्न सुटेल.

श्री. चंद्रकात छाजेड : माननीय मंत्री महोदयांनी या प्रकरणी न्यायालयामध्ये चांगल्यातला चांगला सकारी वकील दिला जाईल असे सांगितले. मग यापूर्वी दिलेला वकील वाईट होता काय ? चांगला आणि वाईट अशी सरकारी वकिलांची कॅटेगरी आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : या प्रश्नाला न्याय मिळावा या हेतूने मी हे वक्तव्य केले.

**सभापती** : जी बाब न्यायप्रविष्ट आहे तिला स्पर्श न करता माननीय सदस्यांनी चर्चा करावी.

श्री. नरेंद्र पाटील : 17 तारखेला निकाल लागल्यानंतर त्याची लवकरात लवकर अंमलबजाणी करावी. परिस्थिती अशी आहे की, माथाडी कामगारांनी आंदोलन केले तर शेतक-यांचे नुकसान होते. जिल्हाधिका-यांनी वसुली केली तर व्यापारी आंदोलन करतात आणि त्यामुळेही शेतक-यांचे नुकसान होते. माथाडी कामगार हा तेथील रहिवाशी आहे, ग्रामस्थ आहे आणि तो देखील शेतक-यांशी निगडित आहे. मंत्री महोदयांनी जबाबदारीने हा प्रश्न निकाली काढावा. माननीय मंत्री महोदयांच्या जिल्ह्यामधील बाजार समितीमध्ये गुळाचा व्यापार मोठया प्रमाणावर होतो. तेथील व्यापारी माथाडी कामगारांची लेव्ही देतात. तिकडे होऊ शकते तर नाशिकमध्ये का होऊ शकणार नाही. म्हणून मंत्री महोदयांनी नाशिककडे दुर्लक्ष करु नये अशी कळकळीची विनंती करतो.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ D/ MMP/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:00

ता.प्र.क्र.42453....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 13 तालुक्यातील सर्व व्यापारी कोर्टात गेलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी हमालासंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. त्या बाबतीत मी त्यांना एवढेच सांगू इच्छितो की, हे हमाल लोक आहेत, ओझे उचलणारे लोक आहेत, त्यांना प्रतिष्ठा देण्याकरिता जे काही करता येईल ते निश्चितपणे करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-------------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**औचित्याच्या मुद्दयासंबंधी**</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानसभा आणि विधानपरिषदेतील सदस्य आपल्या दृष्टीकोनातून समान आहेत. शासन म्हणून माननीय मंत्री महोदय हे सभागृहात उत्तरे देत असतात. मला जी माहिती उपलब्ध झालेली आहे, ती सत्य असेल तर ठीक आहे, सत्य नसेल तर त्याबाबतीत मला काही म्हणावयाचे नाही. विधानसभा आणि विधानपरिषदेतील सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना विकास कामांकरिता वेगळा 10 कोटी रुपयांचा विकास निधी उपलब्ध करुन दिला आहे अशा प्रकारची अधिकृत माहिती आम्हाला प्राप्त झालेली आहे. ही वस्तुस्थिती असेल तर, माझी एवढीच शासनास विनंती आहे की, दोन्ही सभागृहातील सदस्य समान असल्यामुळे शासनाला अशा प्रकारचा दुजाभाव करता येणार नाही. आपण सदस्यांचे रक्षक आहात. शासनाकडून अशा प्रकारचा विकास निधी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना दिला गेला असेल तर सभागृहातील सर्व सदस्यांना तो दिला गेला पाहिजे अशी आमची मागणी आहे. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना विकास कामांसाठी 10 कोटी रुपयांचा निधी वेगळा दिला गेला असेल तर, तसा विकास निधी सर्व सदस्यांना उपलब्ध करुन दिला गेला पाहिजे. या बाबतीतील वस्तुस्थिती सभागृहाला मिळाली पाहिजे. आजच्या कार्यक्रमपत्रिकेत शोकप्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. शोकप्रस्ताव संमत झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज उद्यापर्यंत स्थगित होईल. त्यामुळे विकास निधीच्या बाबतीत वस्तुस्थिती काय आहे, यासंबंधी माननीय वित्तमंत्र्यांनी उद्या सभागृहात निवेदन करावे, अशी मी आपल्यामार्फत विनंती करतो.

**सभापती** : ठीक आहे.

------

3....



ABG/ D/ D/ MMP/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर, यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सभागृहाने अभिष्टचिंतन करावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांचा आज वाढदिवस आहे. त्यामुळे सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात येत आहे.

-----------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री ) : सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 7-महाराष्ट्र आकस्मिकता निधी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.संजय सावकारे ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 10-महाराष्ट्र कृषी विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------------

श्री.सुरेश धस ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 6-महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) :सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 8- महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 9- महाराष्ट्र विद्यापीठ क्रमांक 9- महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 13- महाराष्ट्र कृषी,पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे (पुढे सुरु.....

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 11- मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अध्यादेश, 2013 सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 12 - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2013 सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2013-14 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013-14 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2013-14 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2013-14 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी अतिरिक्त सचिव वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव : खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

(1) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 1 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, 2013.

(2) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, 2013.

(3) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 10 - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, 2013.

(4) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 11- महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) विधेयक 2013.

(5) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 12 - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2013.

(6) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 13- महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, 2013.

(7) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 14- महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते; महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते; महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, 2013.

(8) सन 2013 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 1- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2013.

-----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: श्री.धनंजय पंडितराव मुंडे, वि.प.स. यांच्या राजीनाम्याची घोषणा

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषद नियम 266 (5) च्या तरतुदींना अनुसरुन मी सभागृहास कळवितो की, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निवडून आलेले श्री.धनंजय पंडितराव मुंडे, वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेतील त्यांच्या सदस्यत्वाचा दिलेला राजीनामा मंगळवार, दिनांक 2 जुलै, 2013 रोजी मध्यान्होत्तर मी स्वीकारला आहे.

------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती** : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

(1) श्री.मोहन जोशी

(2) श्री.किरण पावसकर

(3) श्री.रामनाथ मोते

(4) ॲड.अनिल परब

------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: महाराष्ट्र विधानमंडळ व राष्ट्रकूल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'विधानमंडळाचे विशेषाधिकार' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाची घोषणा.

**सभापती** : आपणा सर्वांना विदित आहेच की, राष्ट्रकूल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे विविध प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित करण्यात येतात. महाराष्ट्र विधानमंडळ आणि राष्ट्रकूल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या संयुक्त विद्यमाने 'विधानमंडळाचे विशेषाधिकार' या माननीय सदस्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयासंबंधी उद्या मंगळवार, दिनांक 16 जुलै, 2013 रोजी मध्यवर्ती सभागृह, चौथा मजला, विधानभवन, मुंबई येथे दुपारी 03.15 ते सायंकाळी 06.00 या वेळेत परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी नामवंत विषयतज्ज्ञांना वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे.

परिसंवादाचे उद्‌घाटन माननीय मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या सन्मान्य उपस्थितीत होणार आहे.

नंतर ओ.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

यावेळी मा.मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते तसेच अन्य मान्यवरांच्या सन्मान्य उपस्थितीत डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी संकलित केलेल्या (1) संसदीय विशेषाधिकार : एक दृष्टिक्षेप Parliamentary Privileges : A Brief Overview (Evolution, Genesis,Growth) तसेच (2) Law of Parliamentary Privileges (With Special Reference to Maharashtra Legislature) या दोन पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. यासंबंधीचे निमंत्रण सर्व सदस्यांना त्यांचेसाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणाद्वारे वितरित करण्यात आले आहे. तरी सर्व माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी परिसंवादास उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** शोक प्रस्ताव

**मु.शी.:** दिनांक 17 जून, 2013 च्या सुमारास उत्तराखंड व हिमाचल प्रदेशात महाप्रलयामुळे मृत्युमुखी पडलेले नागरिक, यात्रेकरु आणि तेथील मदत कार्यामध्ये शहीद झालेल्या भारतीय जवानांच्या दुःखद निधनाबद्दल तसेच श्री. दिनकर बाळू ऊर्फ दि.बा.पाटील, माजी वि.प.स.यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तराखंड येथील महाप्रलयामध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांबद्दल तसेच श्री. दिनकर बाळू ऊर्फ दि.बा.पाटील, माजी वि.प.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"उत्तराखंड येथील महाप्रलयात महाराष्ट्रातील मृत्युमुखी पडलेल्या श्रीमती उमा संतनूर, श्री.सुनील हरिलाल सोनी, श्रीमती गुलाब दोषी व श्री. प्रद्युम्न तोष्णीवाल हे 4 नागरिक तसेच महाप्रलयात मदत कार्य करताना शहीद झालेले कॅप्टन डॅरीयल कॅस्टलिनो, कॉन्स्टेबल शशिकांत पवार, कॉन्स्टेबल गणेश अहिरराव व या दुर्घटनेत मरण पावलेल्या सर्वच नागरिकांबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते".

सभापती महोदय, आता पर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातून उत्तराखंडमध्ये गेलेल्या एकूण 3014 नागरिकांपैकी 2852 लोकांना सुरक्षितपणे परत आणण्यात यश आले आहे. मात्र अद्यापही 158 लोक बेपत्ता आहेत. या प्रलयानंतर राज्य शासनाने एक दिवसही उशीर न करता तातडीने पावले उचलली, हे मी या ठिकाणी आपणा सर्वांना सांगू इच्छितो. उत्तराखंडामधील महाप्रलयानंतर राज्य शासनाने तातडीने आपत्कालीन दूरध्वनी सेवा 24 तास मुंबईत प्रथमतः सुरू केली. तसेच डेहराडून येथे 3 हेल्पलाईन्स सुरू करण्यात आल्या. महाराष्ट्रातील यात्रेकरू व पर्यटक या सर्वांना राज्यात सुखरुप आणण्याकरिता राज्य शासनाने दिनांक 17 जून 2013 पासून उत्तराखंड येथे शिबिर कार्यालय सुरू केले आहे. अतिरिक्त निवासी आयुक्तांच्या नेतृत्त्वाखाली एका टीमला डेहराडून येथे पाठवून तातडीने नियंत्रण कक्ष सुरु केला.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

24 तास आणि सातही दिवस हेल्पलाईन स्थापन करण्याबरोबरच उत्तराखंड येथे 50 अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कायमस्वरुपी पथक तैनात करण्यात आले. या शिवाय ऋषीकेश, हरिद्वार तोव सहस्त्रधारा अशा एकंदर पाच ठिकाणी पथके तैनात करण्यात आली. स्वत: मा.मुख्यमंत्री 3 दिवस दिल्लीमध्ये तसेच डेहराडून आणि हरिद्वार येथे जाऊन बचाव कार्याची पाहणी करीत होते. तसेच माननीय मदत व पुनर्वसन राज्यमंत्री श्री. सुरेश धस हे स्वत: जातीने उपस्थित राहून बचाव कार्यात समन्वय साधत होते. महाराष्ट्रातील यात्रेकरुंना तातडीने रेल्वेची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी रेल्वे मंत्र्यांशी देखील बोलण्यात आले. या संपूर्ण मोहिमेला पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून हेलिकॉप्टर तसेच वैद्यकीय साधन सामुग्री आदी सुविधा वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र सदन येथे नियंत्रण कक्ष स्थापन करुन महाप्रलयात सापडलेल्या नागरिकांना रेल्वे तसेच विमानाद्वारे महाराष्ट्रात परत पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. सभागृहाच्या वतीने आणि वैयक्तिक रित्या मृत्युमुखी पडलेल्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै.दिनकर बाळू ऊर्फ दि.बा. पाटील यांचा जन्म 13 जानेवारी, 1926 रोजी रायगड जिल्ह्यात उरण तालुक्यातील जासई येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै.पाटील यांनी 1942 च्या स्वातंत्र्य लढयात तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता.

कै.पाटील यांनी सुरुवातीस काही काळ वकिली केली होती. तसेच पनवेल महाविद्यालयाचे संस्थापक-अध्यक्ष, रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, नॅशनल युनियन ऑफ बॅकवर्ड क्लासेस अँड अदर मायनॉरिटीज संस्थेच्या महाराष्ट्र शाखेचे प्रदेशाध्यक्ष तसेच पनवेल-उरण जमीन बचाव समितीचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. रायगड जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै.पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस, महाराष्ट्र शेतकरी सभेचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. ते शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. पक्षाच्या अनेक

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ....

आंदोलनांचे नेतृत्व त्यांनी केले होते. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या आंदोलनात त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता. भूमिपुत्र, शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि प्रकल्पग्रस्तांचा बुलंद आवाज अशीच त्यांची ओळख होती. ठाणे व रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी अखेर पर्यंत त्यांनी लढा दिला होता.

कै.पाटील यांनी रायगड जिल्हा लोकल बोर्डाचे सभासद, पनवेल नगरपालिकेचे सदस्य तर काही काळ  नगराध्यक्ष पदही भूषविले होते.

कै.पाटील 1957, 1962, 1967, 1972 व 1980 असे पाच वेळा रायगड जिल्ह्यातील पनवेल मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. तसेच 1972 ते 1977 व 1982 ते 1983 या काळात विधानसभेचे विरोधी पक्ष नेतेपदही त्यांनी भूषविले होते. तर 1977 व 1984 असे दोन वेळा कुलाबा मतदारसंघातून लोकसभेवर ते निर्वाचित झाले होते. तसेच 1992 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवरही निर्वाचित झाले होते. विधिमंडळात व संसदेतही त्यांनी एक अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून उत्तम कार्य केले होते. 1996 मध्ये राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे "उत्कृष्ट भाषण" पुरस्काराने त्यांना सन्मानित केले होते.

अशा या शेतकरी, कष्टकरी व भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांच्या लढावू ज्येष्ठ नेत्याचे सोमवार दिनांक 24 जून, 2013 रोजी दुःखद निधन झाले.

----

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, माननीय सभागृह नेत्यांनी उत्तराखंड येथे मृत्युमुखी पडलेल्या भाविकांना श्रद्धांजली वाहणारा व आदरणीय श्री.दि.बा.पाटील यांच्या दु:खद निधना संबंधीचा शोक प्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

निसर्गाशी खेळ केल्यानंतर निसर्ग काय करतो याचे प्रत्यंतर उत्तराखंडाच्या ढगफुटीतून आले. निसर्गाच्या विरोधात सर्व नियम धाब्यावर बसवून विकासाच्या गोष्टी आपण करत गेलो आणि त्याचा प्रत्यय या दुर्घटनेमध्ये आहे. 14 ते 17 जूनच्या दरम्यान मोठी अतिवृष्टी झाली आणि न भूतो न भविष्यती अशा प्रकारचे चित्र आपण सर्वांनी पाहिले. यात महाराष्ट्रातील 4 नागरिक अधिकृतपणे मृत्युमुखी पडले आहेत, तर 158 नागरिकांचा मागमूस अद्याप लागलेला नाही, असे त्यांच्या नातेवाईकांनी सरकारला अधिकृतपणे कळविले आहे. 158 नागरिकांमध्ये औरंगाबाद विभागातील 71, नागपूर विभागातील 44, पुणे विभागातील 28, कोकण विभागातील 7, नाशिक व अमरावती विभागातील प्रत्येकी 4 नागरिकांचा समावेश आहे. यातील काही नागरिक अडकले असतील ते लवकरच परत येतील अशी आशा आहे. पण त्यांच्या कुटुंबांच्या आशा मात्र हळूहळू कमी होत चालल्या आहेत. यात बहुतांश ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे.

या शोक प्रस्तावाद्वारे श्रद्धांजली वाहत असताना माननीय सभागृह नेत्यांनी उत्तराखंड येथील नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या भाविकांना राज्य शासनाने कशा प्रकारे मदत केली आहे या संबंधातील जी माहिती जोडली आहे त्यासंबंधी आम्ही नंतर चर्चा करणार आहोत.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

उत्तराखंडामध्ये महाराष्ट्रातील अडकलेल्या भाविकांचा मला फोन आला होता. त्यांनी मला सांगितले की,श्री.प्रकाश काकड नावाचे अधिकारी आमच्याकडे आधार कार्डाची मागणी करीत आहे. आधारकार्ड असेल तरच आपणास मदत मिळेल असे ते सांगत आहेत. तेव्हा मी त्या अधिकाऱ्याशी बोललो त्यानंतर त्यांना मदत देण्यात आली. हा विषय येथे मांडण्यासारखा नाही आपण या विषयावर नंतर चर्चा करु. मला शोक प्रस्तावाच्या वेळी अशा किंवा अन्य राजकीय गोष्टी मांडावयाच्या नाहीत.

सभापती महोदय, उत्तराखंडामध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये भारतीय लष्कर व हवाई दलाने केलेली कामगिरी कौतुकास्पद, मोलाची व अभिनंदनीय आहे. उत्तराखंडातील लोकांना मदत करताना महाराष्ट्रातील तीन जवान शहीद झाले. त्यांच्या कुटुंबीयांना केंद्र शासनाने मदत केलेली आहे. राज्य सरकारने सुध्दा त्यांच्या कुटुंबीयांना मदत करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, उत्तराखंड राज्यात उद्‌भवलेली नैसर्गिक आपत्ती प्रचंड मोठी आहे. या आपत्तीतून बाहेर पडण्यासाठी देशातील सर्वच राज्यांनी उत्तराखंड राज्याला मदत केलेली आहे. आपल्या आमदार फंडातून पाच ते दहा लाख रुपयांचा निधी उत्तराखंड राज्याला देता येईल या दृष्टीने नियोजन विभागाने विशेष निर्णय घ्यावा. अशाप्रकारचा निर्णय झाल्यास दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना आपल्या आमदार फंडातून जी काही पाच-दहा लाख रक्कम ठरेल ती देता येईल. हा निधी माननीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी किंवा किंवा माननीय पंतप्रधान सहाय्यता निधीमध्ये जमा करता येईल. आपण अशाप्रकारे मदत दिल्यास त्या निधीतून तेथील सर्वसामान्य लोकांची घरे उभे राहण्यासाठी फुल ना फुलाची पाकळी म्हणून महाराष्ट्र राज्याचे काही तरी योगदान होईल. तेव्हा या संदर्भात नियोजन विभागाने विशेष निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो आणि उत्तराखंडातील नैसर्गिक आपत्तीमध्ये जे भाविक मृत्युमुखी पडले त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, ज्या राजकीय नेतृत्वाकडे पाहून अनेक नवीन युवा राजकीय पिढ्या उभ्या राहिल्या अशा दि.बा.पाटील यांना आपण येथे श्रध्दांजली वाहत आहोत.

सभापती महोदय, "विकासाला मानवी चेहरा असला पाहिजे" असा नारा सध्या खूप प्रचलित आहे. पण ज्यांनी यातील प्रत्येक शब्द जमिनीवर उतरवला त्यामध्ये श्री.दि.बा.पाटील होते. दि.बा.पाटील म्हणजे प्रकल्पग्रस्तांचे व विस्थापिंताचे प्रश्न घेऊन लढणारे नेते.

सभापती महोदय, सन 1930 चा चिरनेरचा जंगल सत्याग्रह असेल आणि त्या सत्याग्रहाचा दरवर्षी स्मृतीदिन पाळून पुढच्या पिढीपर्यंत स्वातंत्र्याचा सत्याग्रह काय असतो याची शिकवण देणे, सत्याग्रह शब्दाचा अर्थ वास्तवामध्ये आणून त्या प्रमाणे आपली चळवळ पुढे नेणे, मग यामध्ये संयुक्त चळवळीतील त्यांचा सहभाग, 1975 च्या आणीबाणीच्या काळात त्यांना झालेला कारावास, प्रकल्पग्रस्तांचा संघर्ष, असे संघर्षशील नेतृत्व म्हटले तर श्री.दि.बा.पाटील यांचे व्यक्तिमत्व समोर येते.

सभापती महोदय, आपण दि.बा.पाटील यांची आंदोलनातील भाषणे ऐकल्यास असे दिसून येईल ते कधीही विकासाच्या विरोधात नव्हते. पर्यावरणवादी जसे टोकाच्या मताचे असतात ते तसे कधीही नव्हते. पण विकास होत असताना माणूस भरडला जाऊ नये, त्याला जीवंत ठेवले पाहिजे, इतर बाबींचा विकास होत असताना त्याचा देखील विकास झाला पाहिजे असे त्यांचे मत होते.

सभापती महोदय, दि.बा.पाटील यांच्या 1984 च्या लढ्याने देशामध्ये एक नवीन इतिहासाची मांडणी केली. त्यावेळी श्री.वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री होते. रक्त वाया जाऊ देणार नाही अशाप्रकारचे झालेले वक्तव्य हा सर्व संघर्ष आपण ऐकला आहे, पाहिलेला आहे. पण त्यांच्या या संघर्षातून दि.बा.पाटील आणि प्रकल्पग्रस्त असे एक समीकरण झाले होते.

सभापती महोदय, श्री.दि.बा.पाटील यांनी प्रकल्पग्रस्तांना फक्त पैसे दिले नाही तर साडेबारा टक्के शेतीचा वाटा दिला. मला तर असे वाटते की, दि.बा.पाटील यांनी एक नवीन सूत्र दिले होते ते सूत्र म्हणजे ज्या शेतकऱ्यांची शेती प्रकल्पामध्ये जाणार असेल त्यांना साडेबारा टक्के जमीन दिल्यास त्यावर त्यांची कायम स्वरुपी उपजीविका होऊ शकेल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

एकाच वेळी पैसे न देता राज्यात होणाऱ्या सर्व प्रकल्पांच्या ठिकाणी दि.बा. फॉर्म्युला लावला तर विस्थापित लोक मालक होऊन त्यांची प्रगती होऊ शकते. दि.बा.पाटील यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी प्रत्येक प्रकल्पांच्या वेळी त्यांनी दिलेला फॉर्म्युल्याचा विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांच्या भविष्याप्रती कळवळा असणारा द्रष्टा नेता म्हणून दि.बा पाटील यांना पाहता येईल. इतकेच नव्हे तर रायगड, उरण भागात शिक्षणाचे जाळे पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. अशा लढवय्या नेत्याला माझ्या वतीने आणि विरोधी पक्षाच्या वतीने मी भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे नेते आणि राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री यांनी उत्तराखंड येथील नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या भाविकांबाबत तसेच दि.बा. पाटील यांच्या दुःखद निधनाबाबतचा शोक प्रस्ताव मांडलेला आहे.

उत्तराखंड येथे घडलेली घटना ही देशावर आलेली आपत्ती आहे असेच मानले पाहिजे. केदारनाथ येथे घडलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये महाराष्ट्रातील आणि देशातील अनेक भाविक मृत्युमुखी पडले. काही अजूनही बेपत्ता आहेत. त्यांना मृत घोषित केले नसले तरी ते जिवंत आहेत की नाहीत अशी शंका आहे. आपण सर्वजण त्यांची वाट पाहत आहोत, या माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या भावनेशी मी सहमत आहे.

महोदय, केदारनाथच्या आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या दोन कुटुबियांच्या नातेवाईकांना मी काल भेट दिली. जालना जिल्ह्यातील आमदार श्री.सुरेश जेथलिया यांचे मोठे बंधू, त्यांच्या पत्नी, भावाचा मुलगा, सून, तसेच मुलाचा साला आणि त्याची पत्नी असे एकूण सहा जण मृत्युमुखी पडले. ते अद्यापपर्यंत सापडले नाहीत म्हणून त्यांनी आशा सोडून दिली. श्री.सुरेश जेथलिया यांच्या भावाची सव्वा वर्षाची, चार वर्षाची आणि इयत्ता सहावीत असलेली नातवंडे आहेत. इयत्ता चौथीमध्ये असलेल्या मुलीने मला सांगितले, अंकल कल मेरा बर्थ डे है. डॅडी और मम्मी आने वाले है. अंकल, आप भी आ जाओ. महोदय, अशा प्रकारच्या भावना त्यांच्या लहान मुलांकडून व्यक्त होत आहेत. त्या कुटुंबातील लहान मुलांचे हे रोजचे मरण आहे. तसेच कुलकर्णी नावाच्या दुसऱ्या कुटुंबियाच्या नातेवाईकांना मी भेटून आलो. ते ज्येष्ठ नागरिक सुध्दा त्या आपत्तीचे बळी ठरले. ते बेपत्ता झाल्यामुळे व अजून त्यांचा ठावठिकाणा लागत नसल्यामुळे ते जिवंत असल्याची आशा सोडून दिली आहे. उत्तराखंड येथे घडलेल्या घटनेच्या कथा-सूर कथा आपण दूरचित्र वाहिन्यांच्या माध्यमातून पाहतो. मी सुध्दा त्या ठिकाणी दोन-तीन वेळा जाऊन आलो आहे. त्या ठिकाणचा प्रदेश, तेथील नद्यांचा वेग आणि तेथील एकंदरीत परिस्थिती बघितली आहे. त्या ठिकाणी जे घडले ते गंभीर आहे. भारतातील सर्वच राज्यातील कोणी ना कोणी त्या ठिकाणी गेले आणि कोणाला ना कोणाला वाचवले.

सभापती महोदय, मी आज सकाळी आपल्याला भेटून विनंती केली की, उत्तराखंड येथील नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यमुखी पडलेल्या व्यक्तींबद्दल शोक प्रस्ताव मांडावा तसेच त्या आपत्तीमध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सैनिकांनी जे अतुल्य कार्य केले त्यांचा गौरव प्रस्ताव विधिमंडळाने पारीत करावा. शोक प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जी माहिती दिली ती अयोग्य आहे असे मी म्हणत नाही. या आपत्तीच्या वेळी राज्य सरकारने काय काम केले या बाबत वेगळा विषय मांडून त्यावर 15-20 मिनिटे चर्चा केली असती तर राज्याने केलेल्या गौरवशाली कामाचा उल्लेख त्यांना करता आला असता.

महोदय, अशा प्रकारचा शोक प्रस्ताव मांडणे हा सदनाच्या नेत्याचा अधिकार आहे. मी तर म्हणेन की, माननीय राज्यमंत्री श्री.सुरेश धस यांनी हा शोक प्रस्ताव मांडला असता तर आणखी चांगले झाले असते. कारण त्यांनी 8 दिवस त्या ठिकाणी रात्रं-दिवस थांबून लोकांना मदत केली. इतर राज्यांनी हा उपक्रम राबविला की नाही हे मला माहीत नाही. परंतु महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून एका माननीय राज्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी जाऊन स्वत: मदत कार्य करणे हे मोठे काम आहे. त्यांनी त्या ठिकाणची परिस्थिती स्वत: अनुभवली आहे. या नैसर्गिक आपत्तीमध्ये जे मृत पावले आहेत त्यांना माझ्या आणि माझ्या पक्षाच्या वतीने आदरांजली वाहतो.

महोदय, महाराष्ट्रामध्ये ज्या दिग्गजांनी स्वत:च्या कर्तृत्वाने आपले नाव गाजवले त्यापैकी दि.बा.पाटील हे एक आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आमच्या लहानपणी आम्ही जे वाचत होतो, जे ऐकत होतो त्यावेळी श्री. दि.बा.पाटील केंद्रस्थानी असावे असे त्यांचे कर्तृत्व अतुल्य होते. त्या काळामध्ये आमचे एक आमदार श्री. शेट्ये त्यांच्या बरोबर असावयाचे. त्यावेळी या सर्वांना आम्ही भेटत होतो. आम्हाला त्यांचा आदर्श वाटावयाचा म्हणून आम्ही त्यांना भेटत होतो. श्री. शेट्ये हे दादरला सातत्याने येत असत. श्री. दि.बा.पाटील यांना विधिमंडळातील कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव होता. श्री. गणपतराव देशमुख यांना जास्त अनुभव आहे परंतु श्री. गणपतराव देशमुख, श्री. दि.बा.पाटील हे सर्व विधिमंडळाचे वैभवच आहेत. त्यानंतर श्री. दि.बा. पाटील दोन वेळा खासदार झाले. शेतकरी संघटनेचे आंदोलन होण्यापूर्वी 1984 साली जसईचे आंदोलन गाजले.

या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी बरोबर सांगितले की, ते विकासाच्या विरोधात नव्हते पण विकासाच्या बाबतीत पिढ्यान पिढ्याचे आपले जे उद्ध्वस्त होत आहे त्यांचे व्यवस्थित पुनर्वसन झालेच पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. म्हणून त्यांनी साडेबारा टक्केचा जो दि.बा. फॉर्म्युला तयार केला तो जर भविष्यामध्ये या महाराष्ट्रामध्ये राबविला तर विकासाला बाधा येणार नाही आणि विस्थापितांचाही प्रश्न निर्माण होणार नाही असा तो फॉर्म्युला आहे. ते विरोधी पक्षाचे होते म्हणून नव्हे तर त्यांच्या जीवनामध्ये शेतकऱ्यांच्या एका आंदोलनात झालेल्या गोळीबारात जे रक्त सांडले, शेतकऱ्यांच्या एका आंदोलनात झालेल्या गोळीबारामध्ये ज्या शेतकऱ्यांचे प्राण गेले, जे 5 शेतकरी हुतात्मे झाले त्या शेतकरी हुतात्म्यांचा सन्मान म्हणून ज्यांनी आपल्या कृतीतून सन्मान्य मार्ग दाखविला आहे तो मार्ग जर भविष्यामध्ये आपण आपल्या महाराष्ट्रामध्ये वापरला तर विकासही होईल आणि विस्थापितांना सुध्दा न्याय मिळेल. अशा प्रकारची आदरांजली आपण वाहणार का असा प्रश्न या आंदरांजलीच्या निमित्ताने निर्माण होतो.

सभापती महोदय, 1999 मध्ये श्री. दि.बा.पाटील शिवसेनेमध्ये आले. शिवसेनेच्या तिकिटावर त्यांनी लोकसभेची निवडणूक लढविली. ते अल्पकाळ म्हणजे वर्ष-दीडवर्ष आमच्या सानिध्यात होते. ते माननीय शिवसेनाप्रमुखांना भेटत असत. नंतरचा त्यांचा प्रवास आपल्याला माहीत आहे. शेतकरी कामगार पक्षाने प्रचंड सामर्थ्य दिलेले श्री. दि.बा.पाटील शेवटी अशा अवस्थेत का गेले हे आम्हाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

कळले नाही. पण त्या श्री. दि.बा.पाटील यांना आम्ही जवळून पाहिले. ते बैठकीत बसावयाचे तेही आम्ही अनुभवले. या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना प्रचंड ताकद देणारे हे नेतृत्व शेवटपर्यंत लढत राहिले. त्यांचे योगदान संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही आहे आणि सीमा प्रश्नाच्या लढ्यामध्ये सुध्दा आहे. दोन्ही लढ्यांमध्ये भाग घेऊन महाराष्ट्राबद्दलचे आपले प्रेम आणि अखंड महाराष्ट्र असण्याबद्दल आपली जी जबाबदारी आहे त्यासाठी ते शेवटपर्यंत लढत राहिले. असे श्री. दि.बा.पाटील आपल्यातून गेलेले आहेत. मी माझ्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी जे दोन शोक प्रस्ताव मांडलेले आहेत त्यांचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आम्ही राजकारणामध्ये आणि या सभागृहात अभ्यासवर्गातून आलेलो आहोत. आम्हाला ज्यांनी राजकीय धडे दिले, ज्यांनी राजकीय अभ्यासवर्गामध्ये आम्हाला घडविले त्यामध्ये श्री. दि.बा.पाटील हे एक मार्गदर्शक होते. त्यामध्ये श्री. दाजिबा देसाई होते, श्री.एन.डी.पाटील होते. परंतु श्री. दि.बा.पाटील यांच्याशी माझी जास्त जवळीक होती. आपल्याला माहीत आहे की, पक्षांतर्गत सुध्दा वाद असतात. आमच्या पक्षात थोडे वाद होते परंतु त्या वादामध्ये सुध्दा श्री. दि.बा.पाटील यांचे समर्थन करणारा मी त्यांचा एक कार्यकर्ता होतो.

सभापती महोदय, श्री. दि.बा.पाटील यांनी राज्यसभा सोडली तर सर्व संसदीय सभागृहांमध्ये काम केले. त्यांनी लोकल बोर्ड, नगरपालिका, लोकसभा, विधानसभा तसेच विधान परिषदेत काम केले. अशी संधी लोकांना क्वचितच मिळते. श्री. दि.बा.पाटील हे सातत्याने संघर्ष करणारे होते. सुरुवातीला लोकल बोर्डामध्ये येण्यासाठी माझ्या आजोबांनी त्यांना आग्रह केला होता. त्यावेळी ते वकील झाले. ते शेवटपर्यंत माझ्या आजोबांना गुरुस्थानी मानत असत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यावेळी ब्रिटीश काळापासून रायगड जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांचे जे लढे झाले त्या लढ्याचे नेतृत्व माझे आजोबा श्री. नाना पाटील तसेच भाऊसाहेब राऊत यांनी केले.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.......

त्यावेळी या तरुण मुलाला पुढे आणण्यासाठी त्यांनी धडपड केली.

माझ्या आजोबांनी प्रथम पनवेल येथे काम सुरु केले होते. माझे आजोबा शिक्षक होते. माझे वडील श्री.प्रभाकर पाटील व माझे काका श्री.दत्ता पाटील यांचा जन्म पनवेल येथे झाला होता. त्यावेळी ते लाईनआळीमध्ये राहत असते. आमचे आजोबा श्री.प्रभाकर पाटील व श्री.दत्ता पाटील यांच्यापेक्षा ते श्री.दि.बा.पाटील यांना अधिक प्राधान्य देत होते. त्यावेळी बेलापूरपर्यंत येण्यासाठी रस्त्याची सोय नव्हती. माझे आजोबा बेलापूरपर्यंत चालत येऊन दारु मुक्तीचे काम करीत असत. त्यांच्यासोबत लहानपणी श्री.दि.बा.पाटील काम करीत होते.

1952 साली पहिली विधानसभेची निवडणूक झाली. त्यावेळी श्री.नाना पाटील यांनी पनवेल मतदार संघातून निवडणूक लढवावी अशी सर्वांकडून मागणी करण्यात आली. पण त्याला माझ्या आजोबांनी नकार दिला होता. परंतु अलिबागमधून त्यांनी निवडणूक लढविली होती. त्यानंतर 1957 साली निवडणूक झाली होती त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राचे वारे सुरु झाले होते. त्यावेळी लोकांनी पुन्हा त्यांनी पनवेलमधून निवडणूक लढविण्याचा आग्रह धरला होता. परंतु श्री.दि.बा.पाटील यांनीच पनवेलमधून निवडणूक लढविली पाहिजे असा आग्रह होता. तेव्हापासून ते 1980 पर्यंत श्री.दि.बा.पाटील विधानसभेत निवडून येत होते. निवडणुकीसाठी एकही रुपया खर्च न करणारे श्री.दि.बा.पाटील हे एकमेव आमदार होते. त्यांनी लोकसभेची निवडणूक लढविली होती. त्यांच्या नामनिर्देशन पत्राची रक्कमही श्री.दत्तुशेठ पाटील भरत असत. ते त्यांचे खरे समर्थक होते.

रायगड जिल्ह्यात दोन जोड्या प्रसिध्द होत्या. एक म्हणजे श्री.प्रभाकर पाटील व श्री.दत्ता पाटील आणि दुसरी जोडी म्हणजे श्री.दि.बा.पाटील व श्री.दत्तूशेठ पाटील. या दोन जोड्यांच्या माध्यमातून संपूर्ण रायगड जिल्ह्यातील विरोधी पक्षाचे राजकारण चालू असे. ते ज्या ज्यावेळी निवडणूक लढत असत त्यावेळी त्यांच्याकडे पैसे शिल्लक राहत असत. निवडणुकीसाठी लोक त्यांना पैसे जमवून देत होते. त्यातील पैसे शिल्लक राहत होते. रायगड जिल्ह्यातील झिपरशेठ, मुंडे, साकरियाशेठ, जनार्दन भगत असे प्रतिष्ठित व मोठमोठे शेतकरी त्यांना निवडणुकीसाठी पैसे देत असत. हे आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. मी 5-6 वर्षांचा होतो. बेळगांवला लढा दिल्यानंतर श्री.दि.बा.पाटील यांना अटक झाली होती. हौसेखातर मी माझ्या वडिलांसोबत गाडीत

2.......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.जयंत प्र.पाटील...

बसून बेळगांवला गेलो होतो. त्यावेळी श्री.दत्ता पाटील आणि रायगड जिल्ह्यातील 70-80 कार्यकर्त्यांना बेल्लारीच्या तुरुंगात ठेवले होते. श्री.दि.बा.पाटील यांनी ठामपणे सर्वांबरोबर घेऊन चर्चा केली होती. त्यावेळी त्यांनी 8 महिने तुरुंगवास भोगला होता.

श्री.दि.बा.पाटील यांनी रायगड जिल्ह्यात प्रथम भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज पनवेलमध्ये सर्व नेत्यांच्या शिक्षण संस्था दिसत आहेत. त्याचे सर्व श्रेय श्री.दि.बा.पाटील यांना आहे. 1967 सालापर्यंत रायगड जिल्ह्यात अलिबाग महाविद्यालय नावाचे एकच कॉलेज होते. त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे दुसरे कॉलेज रायगडमध्ये सुरु केले. केवळ श्री.दि.बा.पाटील यांच्यामुळे आज पनवेलमध्ये शिक्षणाचे वैभव उभे राहिलेले आहे.

सभापती महोदय, सभागृहामध्ये सध्या 40 : 60 सदस्य असा रेश्यो आहे. 1990 साली या रेश्योमध्ये बदल झाला. त्यावेळी विरोधी पक्षाचे 30-35 सदस्य होते आणि काँग्रेस पक्षाचे प्रचंड बहुमत दिसत होते. आम्ही या सभागृहाचे कामकाज गॅलरीत बसून बघत होतो. त्या काळात एकापेक्षा एक असे दिग्गज सदस्य या सभागृहात होते, त्यांचे मौलिक मार्गदर्शन आम्हाला मिळत होते. सरकारचे वाभाडे काढणारी भाषणे आम्ही ऐकलेली आहेत. सभापती महोदय, आपणही श्री.दि.बा.पाटील यांच्यासोबत काम केलेले आहे. त्यावेळची जी परंपरा होती ती आज आपण विसरत चाललो आहोत.

आज पनवेलच्या जागांचे भरपूर भाव वाढलेले आहेत. श्री.दि.बा.पाटील यांचे पनवेल येथे 'संग्राम' नावाचे घर आहे. ते घरही लोकांनी बांधून दिलेले आहे. ते त्यांनी तसेच ठेवलेले आहे. आजही कामोठे गावातील अनेक लोक त्यांना मानतात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

दोन वर्षापूर्वी ग्रामस्थांनी त्यांना दोन कोटी रुपये दिले होते. ते सर्वच्या सर्व पैसे त्यांनी शिक्षणासाठी आणि आग्री समाजाच्या कल्याणासाठी दिले. श्री. दि.बा.पाटील हे एक आगळे आणि वेगळे व्यक्तिमत्व होते. 1977मध्ये कोणीही निवडणुकीसाठी उभा राहाण्यास तयार नव्हता. त्यांनी लोकसभेच्या चार निवडणुका लढविल्या. त्यातील दोन निवडणुकात ते पराभूत झाले आणि दोन निवडणुकांमध्ये ते विजयी झाले. मी त्यांचा निवडणूक प्रमुख म्हणून हिशेब ठेवणे, प्रचाराचे बोर्ड लावणे अशी कामे करीत होतो. 1977च्या निवडणुकीसाठी 75 हजार रु. खर्च झाला होता. त्यानंतरची 1984ची निवडणूक ऐतिहासिक ठरली. ती निवडणूक त्यांनी बॅ.अंतुले विरुध्द लढविली. देशातील सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले होते. त्या निवडणुकीत श्री. दि.बा.पाटील प्रचंड मतांनी विजयी झाले.

सभापती महोदय, त्यांच्या अनेक आंदोलनामध्ये सहभागी झालेला मी त्यांचा एक सहकारी आहे. 1967 ते 69 या दरम्यान रायगड जिल्ह्यामध्ये सिडकोने शेतक-यांच्या जमिनी घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी शेतक-यांना एकरी 3 हजार रुपये भाव देण्यात येत होता. हा भाव 1984 पर्यंत होता. 3 हजार रुपयापेक्षा जास्त भाव शेतक-यांना दिला जात नव्हता. शेतक-यांना अधिक भाव मिळावा म्हणून 1984मध्ये श्री. दि.बा.पाटील यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात आले. त्यावेळी श्री. दि.बा.पाटील यांना अटक झाली. मलाही अटक झाली. आम्ही 21 दिवस येरवड्याच्या तुरुंगामध्ये होतो. त्यानंतर तेथून आम्हाला सांगलीमध्ये नेण्यात आले. आम्हाला तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतदादा पाटील यांनी बोलावून आमच्याशी चर्चा केली. त्यावेळी माझे वडील श्री. प्रभाकर पाटील आणि काका श्री. दत्ता पाटील हे तेथे होते. स्व. वसंतदादा पाटील यांनी सांगितले की, शेतक-याला जगामध्ये कुठे 40 हजार रुपये भाव आणि साडेबारा टक्के जमीन परत मिळालेली आहे काय ? जगामध्ये कुठे घडले नाही अशी मागणी का करता ? त्यावेळी दोन दिवस चर्चा करुन एकरी 27 हजार रुपये भाव ठरविण्यात आला आणि त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. साडेबारा टक्के जमीन परत मिळाल्यामुळे आज रायगड जिल्हयातील अनेक शेतक-यांची, पनवेलमधील शेतक-यांची कराडो रुपयांची मालमत्ता झालेली आहे. याचे श्रेय श्री. दि.बा.पाटील यांनाच आहे ते कोणीही नाकारु शकणार नाही. त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे रायगड जिल्हयातील शेतक-यांची आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक उन्नती होण्यास मदत झालेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

सभापती महोदय, रिलायन्सच्या संदर्भात आंदोलन झाले. त्या आंदोलनामध्ये एका इन्स्पेक्टरने आताचे विधानसभेतील विद्यमान सदस्य श्री. विवेक पाटील यांच्या कानाखाली मारली. त्यावेळी मी पक्षाचा जिल्हा चिटणीस होतो. श्री. दि.बा.पाटील यांनी मला फोन करुन जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा काढायचा आहे असे सांगितले. आम्ही तीन दिवसामध्ये 3 लाखाचा मोर्चा जिल्हाधिकारी कचेरीवर काढला आणि त्या इन्स्पेक्टरला निलंबित करायला लावले. श्री.विवेक पाटील हे त्यावेळी सभापती होते. एक वेगळे चैतन्य आणि जिद्द वाढविण्याचे काम श्री. दि.बा.पाटील करीत होते.

त्यांच्या शेवटच्या दिवसात मी त्यांना भेटायला जात होतो. मी तिस-यांदा आमदार झाल्यानंतर त्यांना भेटायला गेलो. त्यावेळी ते म्हणाले की, सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात वर्तमानपत्रातील आणि दूरचित्रवाहिन्यावरील बातम्या ऐकून ते कामकाज मला आवडेनासे झाले आहे. येथील कामकाजाबाबत त्यांनी खेद व्यक्त केला. श्री. दि.बा.पाटील यांनी अनेक संस्थामधून काम केले. अखेरपर्यन्त त्यांनी कष्टकरी आणि श्रमजीवी जनतेशी बांधिलकी ठेवून काम केले.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ प्रथम श्री.शिगम 12:45

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, आमचा एक आधार गेला, आमचे एक चांगले मार्गदर्शक गेले. मी त्यांना नेहमीच गुरुस्थानी मानले आहे, अशा महान नेत्याला मी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तसेच पक्षाचा सरचिटणीस या नात्याने आणि माझ्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, उत्तराखंड राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्तीत अनेक भाविक मृत्युमुखी पडले. या आपत्तीच्या ठिकाणी मदत कार्य करीत असताना 20 जवान शहीद झाले, त्यात महाराष्ट्रातील 3 जवानांचा समावेश आहे. या आपत्तीत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल तसेच कै.दिनकर बाळू उर्फ दि.बा.पाटील, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल या सदनाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी शोकप्रस्ताव सदनात मांडला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, देशात सर्वात मोठी नैसर्गिक आपत्तीची घटना उत्तराखंडमध्ये घडली. या नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक भाविकांचे प्राण गेले. अनेक भाविकांना अपंगत्व आले. या नैसर्गिक आपत्तीच्या ठिकाणी मदत कार्य करीत असताना भारताचे 20 जवान मृत्युमुखी पडले. या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन राज्यमंत्री हे दुर्घटनास्थळी जाऊन मदत कार्य करण्यासाठी काही दिवस थांबले होते. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री देखील तीन दिवस त्या क्षेत्रात थांबून होते. या आपत्तीत सापडलेल्या व्यक्तींना मदत पोहोचविण्यासाठी सातत्याने ते प्रयत्न करीत होते. एवढेच नव्हे तर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तराखंड राज्याला 10 कोटी रुपये आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील 3 जवान मदत कार्य करीत असताना त्या ठिकाणी मृत्युमुखी पडले, तसेच अनेक भाविक मृत्युमुखी पडले. महाराष्ट्रातून त्या ठिकाणी दर्शनासाठी गेलेल्या भाविकांमधील 158 भाविक अद्यापही बेपत्ता आहेत. दोन-तीन दिवसापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, 5500 पेक्षा जास्त भाविक या नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेले असावेत.

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातून दर्शनासाठी गेलेले भाविक 15 तारखेपर्यंत घरी परतले नाहीत तर त्यांचा मृत्यू झाला असे समजून त्यांना पुढील मदत देण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल. ही नैसर्गिक आपत्ती उत्तराखंडावर आलेली नसून संपूर्ण देशावर आलेली आहे. उत्तराखंड हे लहानसे राज्य आहे. ते राज्य सर्वस्वी पर्यटनावर अवलंबून आहे. आज

3...



ABG/ MMP/ प्रथम श्री.शिगम 12:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

या लहान राज्यावर नैसर्गिक आपत्ती आलेली आहे, त्या लहानशा राज्याला या आपत्तीचा बोजा पेलणे शक्य नव्हते. त्या राज्यात देशातील सर्वच राज्यांनी मदत केली, त्यामुळे तेथील शासनास थोडासा दिलासा मिळालेला आहे. महाराष्ट्र सरकारने उत्तराखंड राज्यास आर्थिक मदत देण्याविषयी अतिशय महत्वाचा निर्णय घेतला तो निर्णय निश्चितपणे स्वागतार्ह असा आहे.

महोदय, या राज्यातील कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवाहन केले होते की, उत्तराखंड राज्याला आर्थिक मदत देण्यासाठी तालुका स्तरावर मदत फेरी काढावी. त्या कार्यकर्त्यांनी तालुका स्तरावर मदत फेरी काढून आर्थिक मदत गोळा केली. त्याचप्रमाणे विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांना सूचित केले होते की, आपणही उत्तराखंड राज्यास आर्थिक मदत पाठवावी. कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मुंबई शहरातून मदत फेऱ्या काढून 2 कोटी रुपये गोळा केले. महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अशा प्रकारच्या मदत फेऱ्या काढून 1 कोटी रुपये गोळा केले. तसेच मुंबईचे पालक मंत्री श्री.नसीम खान यांच्या प्रभागातील कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अशा प्रकारची मदत फेरी काढून 1 कोटी रुपये गोळा केले.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...........

महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुक्यामधून काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 1 कोटी रुपये गोळा केले. माननीय मंत्री श्री.नसीम खान पालकमंत्री असलेल्या मुंबई उपनगर जिल्हयातून 1 कोटी रुपयांची मदत गोळा केली गेली. महाराष्ट्र काँग्रेस पक्षाच्या वतीने उत्तराखंड राज्यातील आपद्ग्रस्त परिसरात निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जवळजवळ 4 कोटी रुपयांची आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे या नैसर्गिक आपत्तीमध्ये मोठ्या संख्येने संरक्षण दलातील जवान मृत्यूमुखी पडले आहेत. बचत कार्य करीत असताना ज्यांनी गौरवास्पद कामगिरी केली त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडणे हा विषय वेगळा आहे. आज शोक प्रस्ताव मांडण्यात आल्यामुळे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडता येईल का हा तांत्रिक मुद्दा आहे. परंतु भारतीय संरक्षण दलातील जवानांनी केलेल्या कार्याबद्दल गौरव करणारा प्रस्ताव सदनामध्ये मांडला पाहिजे. देशाच्या संरक्षण विभागाचे जवान उत्तराखंडमधील आपत्तीग्रस्त भागात ज्या परिस्थितीत काम करीत होते ते आपण सर्वांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यांचा सन्मान किंवा गौरव करावा अशी मी या निमित्ताने आपल्या माध्यमातून सदनाला विनंती करतो.

सभापती महोदय, कै.दि.बा.पाटील यांच्या निधनाबद्दल सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे. कै.दि.बा.पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षामध्ये सक्रिय नेतृत्वाची धुरा सांभाळली होती. ते पक्षाचे सरचिटणीस तद्वत नेते होते. शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने ते पाच वेळा विधानसभेवर निवडून आले होते, दोन वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. सभागृहात एवढ्या वेळा निवडून येणा-या लोकप्रतिनिधींची संख्या फार कमी आहे.

सभापती महोदय, 1992 मध्ये ते विधानपरिषदेवर विधानसभा सदस्यांद्वारा निवडून आले होते. त्या काळात मी राज्याचा गृह राज्यमंत्री होतो. या सदनामध्ये प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांनी अनेक विषयांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. त्यांनी विचारलेल्या प्रश्नाला योग्य प्रकारे उत्तर देणे भाग पडत असे. केवळ विरोधासाठी विरोध करण्याची त्यांची भूमिका नव्हती. राज्यातील विकासात्मक दृष्टीकोनातून ते सभागृहात प्रश्न मांडायचे. सर्वसामान्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत, त्या विषयांना न्याय मिळाला पाहिजे ही त्यांची भूमिका असायची. शासनाने चांगले काम

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

केले किंवा चांगला निर्णय घेतला तर त्याबद्दल कौतुक करण्यामध्येही ते अग्रेसर असायचे. रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांचे संघटन उभे करुन त्यांच्या प्रश्नांबाबत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने त्यांनी अनेक आंदोलने उभी केली. सर्वच राजकीय पक्षांमध्ये त्यांच्याबद्दल आदरभाव होता. कै.दि.बा.पाटील यांच्या निधनानंतर मी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेलो होतो. त्यांच्या घरी जमलेल्या विविध पक्षातील प्रतिनिधींकडून हेच सांगण्यात आले की, आम्ही वेगवेगळ्या पक्षाचे प्रतिनिधी असलो तरी पनवेल तालुका किंवा रायगड जिल्हयाचे कोणतेही प्रश्न असले तरी त्यांच्यासमवेत आम्ही एकत्र चर्चा करायचो, ते जो आदेश देतील तो सर्व पक्षीय नेते मानत असत. विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणूनही त्यांनी काम केले होते. त्यांच्या कार्यकाळात विकासाचा दृष्टीकोन ठेवून सर्वांनी काम केले पाहिजे हा संदेश दिला गेला. हा संदेश तुम्हा आम्हा सर्वांसाठी महत्वाचा आहे.

मी कै.दि.बा.पाटील यांना माझ्या वतीने आणि कॉँग्रेस पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो. तसेच उत्तराखंड राज्यातील नैसर्गिक आपत्तीमध्ये मोठया संख्येने भाविक, स्थानिक नागरिक व त्या राज्याचे 52 शासकीय कर्मचारी मृत्युमुखी पडले. त्या सर्वांना माझ्या व कॉँग्रेस पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

-------

नंतर एक्स.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाबद्दल माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माणसाच्या विकासाच्या हव्यासापोटी आपण विनाश कसा ओढवून घेतो याचे रौद्ररुप आपण सर्वांनी उत्तराखंडमध्ये पाहिले असून त्या निमित्ताने मी महाराष्ट्रातील भाविकांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, लष्कराच्या जवानांनी आपल्या प्राणाची बाजी लावत सर्वसामान्य भाविकांना वाचविण्यासाठी जो असीम त्याग केला, जे शौर्य दाखवले त्यात महाराष्ट्रातील 3 जवान शहीद झाले. त्यांच्या शौर्याला आणि त्यांच्या त्यागाला मी सलाम करतो. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सांगितले की, जी माणसे आपल्यातून गेली ती पुन्हा येणार नाहीत तसेच त्यांनी त्यांच्या अनाथ मुलांच्या संदर्भातील आठवण सुध्दा या ठिकाणी त्यांनी सांगितली आहे. अनाथ मुलांची काळजी राज्यशासन घेईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, या सभागृहाचे शेतकरी कामगार पक्षाचे माजी विरोधी पक्ष नेते आणि राज्याचे ओबीसीचे झुंजार नेते दि.बा.पाटील आज आपल्यात नाहीत. सभागृहात विरोधी पक्ष नेता कसा झुंजतो याचे प्रत्यक्ष दर्शन मी पत्रकारांच्या लॉबीमधून अनेकदा पाहिले आहे. सभागृहात दि.बा.पाटील विरोधी पक्ष नेता म्हणून सरकारवर आसूड ओढत असत व रत्यावर दडपशाहीच्या विरोधात दोन हातही करत असत. ओ.बी.सी. च्या लढयासाठी दि.बा.पाटील यांचे योगदान अतुलनीय आहे. राज्यात मंडल आयोगाच्या संदर्भात जी चळवळ उभी राहिली त्यात जनार्दन पाटील आणि दि.बा.पाटील ही सगळयात मोठी दोन नावे आहेत. या दोघांनी संबंध राज्यात नवे ओ.बी.सी. नेतृत्व उभे केले,लोकांना लढण्यास शिकवले. या दोघांनी ओ.बी.सी.च्या आरक्षणाच्या संदर्भात विजय प्राप्त करुन घेतला. प्रकल्पग्रस्त आणि दि.बा.पाटील या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या. उरणच्या तसेच जासईच्या सत्याग्रहात दि.बा.पाटील यांनी जे शौर्य गाजवले, जो त्याग केला ते सांगण्यास शब्द अपुरे पडतात. सत्याग्रहाचा संघर्ष मी प्रत्यक्ष पाहिला होता. कोयनेपासून या राज्याने सर्व प्रकल्पग्रस्तांची वाताहात अनुभवलेली आहे. परंतु कोयनेपासून प्रकल्पग्रस्तांची जी वाताहात सुरु होती ती थांबविण्याचे तसेच विकासामध्ये प्रकल्पग्रस्तांना हिस्सेदारी मिळवून देण्याचे काम कोणी केले असेल तर ते दि.बा.पाटील यांनीच केलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

सभापती महोदय, विरोधी पक्षात राहून सुध्दा शासनाला जनतेच्या बाजूने निर्णय करण्यास भाग कसे पाडायचे हे दि.बा.पाटील यांनी दाखवून दिलेले आहे. पुढच्या इतिहासामध्ये दि.बा.पाटील यांचे नाव सदैव स्मरणात राहील तसेच आपल्या सर्वांना प्रेरणा देत राहील. मी दि.बा.पाटील तसेच उत्तराखंडमध्ये मरण पावलेल्या यात्रेकरुंना श्रध्दांजली अर्पण करुन दोन शब्द संपवतो.

धन्यवाद.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, उत्तराखंडमध्ये भयानक नैसर्गिक आपत्ती आली. संपूर्ण देशातील भाविक, यात्रेकरु चारधाम यात्रेला निघालेले असतांनाच उत्तराखंडमध्ये ही आपत्ती आली. उत्तराखंड मध्ये निसर्गाचा जो कोप झाला त्याची दृश्ये आपल्यातील अनेकांनी मोबाईलमध्ये डाऊनलोड करुन बघितली असतील. आम्ही जी फिल्म पाहिली त्यामध्ये पाणी कमी आहे असे समजून एका कुटुंबातील नवरा,बायको, मुलं,मुली पुढे जायची वाट मिळते का हे पाहण्यासाठी थोडे पुढे चालत गेल्याचे आपल्याला त्या फिल्म मध्ये दिसते परंतु नंतर अचानक तो सगळा भाग एकदम पाण्याखाली जातो. आपल्या डोळयादेखत मुनष्यहानी बघितल्यानंतर अस्वस्थतेची जाणीव आपला पाठलाग करीत असते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

ही नैसर्गिक आपत्ती की मानव निर्मित आपत्ती हा एक वादाचा मुद्दा होऊ शकतो. परंतु, त्या खोलामध्ये न जाता हे जे संकट आले आहे त्याचा सामना करण्यासाठी आपल्या राज्यातून विशेष प्रयत्न झाले. आपल्या शासनाने अतिशय कर्तव्यदक्षपणे सहभाग नोंदवला. तरी सुद्धा शेवटी हतबल अवस्थेमध्ये काही नागरिकांचा या नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झाला. बचाव कार्यात सामील असणाऱ्या शूर जवानांचा देखील मृत्यू झाला. एवढेच नव्हे तर अजूनही अनेक जण बेपत्ता आहेत. या सर्वांच्या प्रती या सभागृहात शोक व्यक्त करणे हे अतिशय महत्त्वाचे ठरू शकते.

उत्तराखंड राज्य हे आकाराने आणि लोकसंख्येने लहान आहे. येथे येणाऱ्या यात्रेकरूंमुळेच या राज्याला उत्पन्न मिळते. अशा या राज्याची आर्थिक उभारणी करण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या माध्यमातून सामुदायिक प्रयत्न झाले पाहिजे. त्यामध्ये आपण सर्वजण निश्चितपणे सहभागी होऊ या.

प्रदीर्घ संसदीय कारकिर्द असलेले ज्येष्ठ नेते आदरणीय श्री.दि.बा.पाटील यांच्या दु:खद निधनाचा शोक प्रस्ताव सभागृहा समोर आला आहे.

श्री.दि.बा.पाटील यांचे शिक्षण बी.ए.एलएल.बी.पर्यंत झाले होते. बी.ए.एल.एल.बी.पर्यंत शिकलेला तरूण वकिली करून कुटुंबाला हातभार लावेल अशी अपेक्षा असताना कष्टकरी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी संघर्षाची भूमिका घेऊन रस्त्यावर उतरला. संघर्षाची भूमिका घेऊन रस्त्यावर उतरणारी जी काही माणसे होती ती सुशिक्षित होती. ती स्वत: मोठी होऊ शकली असती. पण त्यांना लोकांचे प्रश्न जास्त महत्त्वाचे वाटले.

श्री.दि.बा.पाटील यांनी 1942 च्या स्वातंत्र्य लढ्यात तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता. इतकेच नव्हे तर महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाच्या व सिडकोच्या जमिनीं प्रश्नाच्या आंदोलनात देखील सहभाग घेतला होता. अशा प्रकारे शेतकरी, कष्टकऱ्यांचा ध्यास असलेला हा नेता होता.

प्रदीर्घ संसदीय कारकिर्दीमध्ये त्यांनी अतिशय चांगले असे योगदान दिले आहे. राज्याच्या विकासामध्ये सत्ताधाऱ्यांचे जेवढे योगदान असते तितकेच मोलाचे योगदान विरोधी पक्षातील मान्यवर सदस्यांचा देखील असते. त्यादृष्टीनेच श्री.दि.बा.पाटील हे एक आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

आपल्या विधान मंडळाला एक परंपरा आहे. वेगवेगळ्या नेत्यांच्या नावाने व्याख्यानमाला किंवा विशिष्ट संघर्षाबद्दल व्याख्याने आपण आयोजित करीत असतो. माझी माननीय सभापती महोदयांना सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे की, आदरणीय श्री.दि.बा.पाटील यांच्या नावाने सुद्धा दरवर्षी "संघर्ष आणि राजकारण" या विषयावर एक व्याख्यान त्यांच्या स्मृतिदिना निमित्त आयोजित करण्यात यावे. त्याद्वारे नवीन येणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या ज्ञानामध्ये मोलाची भर पडेल असे मला वाटते.

ही सर्व माणसे मोठी होती. आज आपण जे काम करतो ते खूपच वरवरच्या मलमपट्टीचे आहे असे वाटते. प्रदीर्घ अनुभव असल्यामुळे ही जुनी माणसे खोलात जाऊन काम करत होती. ते शेवट पर्यंत फकिरी वृत्तीने काम करत होते. अशी माणसे महाराष्ट्रातील नवरत्नांपैकी एक आहेत असे म्हटले तर वावगे होणार नाही.

मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आदरणीय श्री.दि.बा.पाटील यांना भावपूर्ण श्रद्धाजली अर्पण करतो.

...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन (जळगाव प्राधिकारी स्थानिक स्वराज्य संस्था) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

माजी सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांच्या प्रदीर्घ अनुभवा बद्दल व गल्ली ते दिल्ली आणि दिल्ली ते मुंबई या प्रवासा बद्दल सन्माननीय सदस्य श्री.जयंतभाई पाटील यांनी वर्णन केले आहे. श्री.दि.बा.पाटील हे विधान सभेचे तसेच विधान परिषदेचे सदस्य होते. त्याद्वारे त्यांनी गोरगरीब जनतेच्या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्याचा गौरव आम्हा महाराष्ट्रातील सर्व लोकांना वाटतो.

सभापती महोदय, उत्तराखंडमध्ये अतिवृष्टीमुळे फार मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेला आता एक महिना झाला आहे. या दुर्घटनेमध्ये जीवित हानी फार मोठ्या प्रमाणावर झाली आहे. त्यासंबंधी माननीय सदस्यांनी आपल्या भावना प्रकट केल्या आहेत. या दुर्घटनेच्या बचाव कार्यात महाराष्ट्रातील तीन जवान मृत्युमुखी पडले आहेत. त्यातील एक मुंबईचा आहे. एक खानदेशातील होता, चाळीसगावातील होता.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन.....

या शहीद झालेल्या जवानांमध्ये आमच्या जळगाव जिल्ह्यातील वडालावडाली गावातील श्री.गणेश अहिरराव होते. गणेश अहिरराव यांचा धाकटा भाऊ हा देखील सैन्यामध्ये आहे आणि त्याची पोस्टींग देखील उत्तराखंडामध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या भाविकांना मदत करण्यासाठी झाली आहे. गणेश अहिरराव यांच्या वडिलांना तेथील पत्रकारांनी विचारले की, आपल्या मोठ्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झालेला आहे आणि आपल्या धाकट्या मुलाची देखील त्याच ठिकाणी नियुक्ती झाली आहे. तेव्हा आपण त्यास घरी थांबवणार काय ? यावर त्यांनी उत्तर दिले की, माझ्या मोठ्या मुलाचे तेराव्याचे कार्य झाल्यानंतर चौदाव्या दिवशी माझा धाकटा मुलगा नियुक्तीच्या ठिकाणी हजर होईल. मी माझ्या धाकट्या मुलाला देशसेवेसाठी पाठविणार आहेच. परंतु मला आणखी चार मुले असते तर मी त्यांना देखील देशसेवेसाठी पाठविले असते. गणेश अहिरराव यांच्या वडिलांनी आपल्यावर दु:खाचा डोंगर कोसळलेला असताना अशाप्रकारचे दिलेले उत्तर आपणा सर्वांना निश्चितपणे अभिमानास्पद वाटणारे आणि ऊर भरुन येणारे आहे.

सभापती महोदय, उत्तराखंडामध्ये जे जवान शहीद झाले होते त्यांची ओळख पटत नव्हती. तेव्हा गणेश अहिरराव यांच्या आईची डीएनए चाचणी घेण्यात आली. गणेश अहिरराव यांचे पार्थिव वडालावडीला आणण्यात आले त्यावेळचे दृश्य हे हृदय हेलावणारे होते. सर्वजण भावनाविवश झाले होते.

सभापती महोदय, शहीद गणेश अहिरराव यांच्या कुटुंबीयांना शासनातर्फे मदत करण्यात येईलच. परंतु या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री हे उपस्थित आहेत, माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे की, जळगाव जिल्ह्यामध्ये शहीद गणेश अहिरराव यांचे स्मारक उभारावे. त्या गावातील 25 तरुण सैन्यामध्ये भरती झालेले आहेत. आपण असे स्मारक उभे केल्यास शहिदांच्या पाठीशी शासन उभे आहे अशी भावना त्यांच्यामध्ये निर्माण होईल. तेव्हा माझी विनंती शासनाने मान्य करावी. उत्तराखंडामध्ये झालेल्या प्रलयामध्ये जे भाविक मृत्यमुखी पडले व जे जवान शहीद झाले त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सभागृहात जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी व त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी येथे दोन शोक प्रस्ताव मांडले. पहिला शोक प्रस्ताव हा उत्तराखंडामध्ये ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये जे हजारो भाविक मृत्युमुखी पडले त्या संदर्भातील आहे. तर दुसरा शोक प्रस्ताव हा माजी वि.प.स. श्री.दि.बा.पाटील यांच्या संदर्भातील आहे.

सभापती महोदय, नैसर्गिक आपत्ती हा राजकारणाचा भाग नाही. अशावेळी माणुसकी कामाला येते. तेव्हा राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण हे स्वत: उत्तराखंड राज्यात जाऊन आले. त्यांनी त्या राज्याला आर्थिक मदतही केली. तसेच त्या ठिकाणी जे भाविक अडकलेले आहेत त्यांना बाहेर काढण्यासाठी देखील प्रयत्न केले. उत्तराखंड राज्यात सर्व स्तरांतून मदत पाठवून महाराष्ट्र उत्तराखंड राज्याच्या पाठीशी उभा आहे असे चित्र आपण निर्माण केलेले आहे.

सभापती महोदय, उत्तराखंड राज्यामध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या भाविकांना बाहेर काढताना देशाचे 20 जवान शहीद झाले. नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी लष्काराने आणि हवाई दलाने केलेले काम निश्चितच कौतुकास्पद आहे आणि देशातील सर्व लोकांनी त्याचे कौतुक केलेले आहे.

सभापती महोदय, उत्तराखंड राज्यावर जी नैसर्गिक आपत्ती कोसळली ती खरी म्हणजे देशावर कोसळलेली नैसर्गिक आपत्ती आहे असे आपणा सर्वांचे मत आहे. पुन्हा अशाप्रकारची आपत्ती देशावर येऊ नये अशी आपण ईश्वराकडे प्रार्थना करु या.

सभापती महोदय, उत्तराखंडातील नैसर्गिक आपत्तीमध्ये जे भाविक मृत्युमुखी पडले त्यांना मी माझ्यातर्फे व महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

यानंतर श्री.बोर्डे..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

माननीय उप मुख्यमंत्री यांनी दुसरा शोक प्रस्ताव शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते कै.दि.बा.पाटील यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडला.

महोदय, मी विधानसभेवर 1990 मध्ये पहिल्यांदा निवडून आलो. मी सभागृहात आल्यानंतर अनेक दिग्गज नेते जवळून पाहिले. ज्यांच्याबद्दल पूर्वी ऐकत होतो, ज्यांच्याबद्दल वाचत होतो त्यांना जवळून पाहण्याचा मला योग आला. ज्या दिग्गजांची अनेक भाषणे ऐकण्याची मला संधी मिळाली त्यातील दि.बा.पाटील हे एक होय. मी मंत्री असताना दि.बा.पाटील यांना याच सदनात जवळून पाहिले. त्यांचे कामकाज कोणत्या दर्जाचे होते हे मी जवळून बघितले. दि.बा.पाटील यांना उत्कृष्ट संसदपटू म्हणून पुरस्कार मिळाला होता. उत्कृष्ट संसदपटू असलेले दि.बा. पाटील कसे काम करतात हे मला या ठिकाणी अनुभवायला आणि पाहायला मिळाले. दि.बा.पाटील यांचे राहणीमान सरळ आणि साधे होते. आपल्या मतदारसंघातील मतदार किंवा जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी यांना न्याय मिळवून देण्यासाठी सभागृहातील आयुधांचा वापर कसा करावा याचे कौशल्य त्यांना अवगत होते. त्या कौशल्याच्या माध्यमातून त्यांनी या सदनात अनेक आयुधांचा प्रखरपणे आणि संघर्षमय वापर केला आणि सरकारकडून अनेक विकासात्मक कामे करुन घेतली. किंबहुना त्या आयुधांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचेच काम केले. अतिशय शांत वाटणारे आमचे दि.बा.पाटील यांचे जीवनच संघर्षमय होते.

महोदय, दि.बा.पाटील यांना एखादा प्रश्न विचारायचा असल्यास ते प्रथम बोलण्यासाठी संधी मिळावी म्हणून आपला हात वर करायचे. त्यांना बोलण्याची संधी मिळताच ते उभे राहायचे आणि आपला विषय मांडायचे. एखाद्या विषयाचा कसा कीस काढावा हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते. कोणताही विषय अभ्यासपूर्ण आणि प्रभावीपणे मांडणे हे त्यांचे खरे कौशल्य होते. ते ज्या वेळी बोलण्यासाठी उभे राहायचे त्या वेळी प्रश्नाला न्याय मिळेपर्यंत स्वस्थ बसत नव्हते. आश्वासन घेतल्यानंतरच ते खाली बसायचे. कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत न्याय मिळविणे हा त्यांचा हट्टच होता. ते अभ्यासू आणि बुध्दीवान होते. त्यांनी आमदार, खासदार ही पदे अनेक वर्षे भूषविली. खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी कसा असतो हा आदर्श ते आपल्या जीवनातून सर्वांसमोर ठेवून गेलेले आहेत. विधानसभा किंवा विधानपरिषदेत एखादा नवीन सदस्य आल्यास त्याने दि.बा.पाटील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

यांच्यासारखे आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून काम केले पाहिजे. दि.बा.पाटील यांनी सभागृहात ज्या पध्दतीने काम केले त्याच कार्यपध्दतीनुसार आपण सर्वांनी काम केले पाहिजे.

सभापती महोदय, दि.बा.पाटील आणि दत्ता पाटील हे दोघेही सभागृह संपल्यानंतर कधीही थेट घरी गेले नाहीत. सभागृह संपल्यानंतर ते ग्रंथालयात जायचे. त्या ठिकाणी काही वेळ बसल्यानंतरच घरी जायचे. मलाही दत्ता पाटील यांनी ग्रंथालय दाखविले.

महोदय, मी कोकणातील आमदार असल्यामुळे दि.बा.पाटील हे मला फोनवरुन किंवा प्रत्यक्ष भेटल्यानंतर अनेक विषयांबाबत मार्गदर्शन करायचे. ते मला सांगायचे की, नारायण, कोकणासाठी आपण हे केले पाहिजे. मध्यंतरी ते आमदार नव्हते. मी महसूल मंत्री असताना रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी फोन करुन अमुक गोष्ट करण्यासाठी मदत कर असे ते हक्काने सांगत.

महोदय, दि.बा.पाटील आज आपल्यामध्ये नाहीत याचे मला दु:ख आहे. त्यांचे काम आणि कार्य वाखाणण्याजोगे आहे. माणूस म्हणून ते ज्या प्रमाणे वागत होते ते योग्य होते. त्यांनी सहकाऱ्यांना मोठे करण्याचे काम केले. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक शब्दप्रयोग केला. त्यांनी सांगितले की, दि.बा.पाटील यांनी रायगडच्या शेतकऱ्यांना करोडपती केले. मी त्यांना सांगू इच्छितो की, आजच्या काळात शेतकऱ्यांना करोडपती करणे हे महान कार्य आहे. शेतकऱ्यांना करोडपती करण्याचे कठीण काम त्यांनी सोपे केले. सिडको प्रकल्पात जमीन गेलेल्या प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के जमीन मिळवून देण्याचे काम त्यांनी केले.

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ....

हे एका दिवसामध्ये झालेले नाही. यासाठी त्यांनी घाम गाळला, कष्ट केले, मेहनत केली, आंदोलने केली आणि त्यातून आज रायगडचा नागरिक करोडपती झाला ही गोष्ट तेथील शेतकरी कायम स्मरणात ठेवतील. ही गोष्ट ते कधीही विसरणार नाहीत. आजची रायगडची जी प्रगती झालेली आहे त्यामध्ये श्री. दि.बा.पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे, हे मला सांगावेसे वाटते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील दिसत आहेत, बोलत आहेत, काम करत आहेत त्यामागेही श्री. दि.बा.पाटील आहेत. यामध्ये त्यांचे स्वत:चेही कष्ट आहेत, मेहनत आहे. पण कोणी तरी गुरु लागतो, मार्गदर्शक लागतो आणि तेव्हाच माणूस घडत जातो असे मला वाटते. श्री.दि.बा.पाटील यांनी घडविलेला एक आमदार विधान परिषदेमध्ये काम करीत असल्याचे आपण पाहतो.

सभापती महोदय, श्री. दि.बा.पाटील हे आमच्या कोकणातील होते. एवढे अभ्यासू, विद्वान नेते, ज्यांनी रायगडमध्ये संपूर्ण समृध्दी आणली असे हे नेते आमच्या कोकणातील होते हे सांगताना मला अभिमान वाटतो. ते चारित्र्यसंपन्न तसेच मदत करणारे होते. असे कर्तृत्ववान नेतृत्व आमच्यातून हरपले आहे याचे दु:ख आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या दोन्ही प्रस्तावांना पाठिंबा देत असताना उत्तराखंडमध्ये मृत्यू पावलेले भाविक तसेच आमच्यातून गेलेले श्री. दि.बा.पाटील यांना माझ्यातर्फे, माझ्या कुटुंबातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे मी श्रध्दांजली अर्पण करतो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या सदनाचे नेते राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री यांनी या सदनामध्ये जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि आदरांजली वाहण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, उत्तराखंडमध्ये जी नैसर्गिक आपत्ती आली त्याबद्दल आपणा सर्वांना माहिती आहे. त्यामध्ये झालेला विध्वंस, झालेली मनुष्यहानी तसेच आपल्या राज्यातील आणि देशभरातील भाविकांचे झालेले नुकसान, त्या बाबतीत राज्य शासनाने घेतलेली भूमिका, राज्य शासनाने केलेले काम आपल्याला माहीत आहे. मी स्वत: संपूर्ण एक दिवस दिल्लीतील महाराष्ट्र सदनातील मदत केंद्रामध्ये बसलो होतो. राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण तसेच माननीय राज्यमंत्री श्री. सुरेश धस त्या ठिकाणी गेले होते. स्वत: माननीय मुख्यमंत्री जवळजवळ दोन-तीन दिवस त्या ठिकाणी होते. माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्राच्या भाविकांसाठी दिल्लीवरुन एक स्पेशन ट्रेन सोडण्यात आली. दुसऱ्या राज्यामध्ये असे घडले की नाही हे मला माहीत नाही पण महाराष्ट्राच्या भाविकांसाठी नक्की असे घडले.

सभापती महोदय, उत्तराखंडातील 9 गावे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. आज त्या गावामध्ये काहीही शिल्लक नाही. त्या 9 गावातील हजारो नागरिक हे सुध्दा आपल्या देशाचेच नागरिक आहेत. त्यांनाही मानवतेच्या दृष्टीने, माणुसकीच्या दृष्टीने श्रध्दांजली वाहण्याची आवश्यकता आहे. त्यांना या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण करीत असताना उत्तराखंडातील मदत कार्यामध्ये जे 20 जवान शहीद झाले त्यामध्ये महाराष्ट्रातील चार जवान होते. त्यांनाही या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण करीत असताना या ठिकाणी एक विनंती नक्कीच करावी लागेल. त्याचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी केला. आपल्या राज्यामध्ये जर एखादी आपत्ती आली तर आपण आपल्या निधीतून काही मदत करु शकतो अशी तरतूद आपल्याकडे केलेली आहे. हीच तरतूद देशातील अशा नैसर्गिक आपत्तीसाठी जर करु शकलो तर उत्तराखंडमधील घटना असेल किंवा अशा प्रकारच्या ज्या दुर्दैवी घटना घडत असतील त्यामध्ये सुध्दा आपल्याला मदत करणे सोपे जाईल असे मला वाटते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

RDB/

श्री. भाई जगताप .....

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, मुंबई प्रदेश काँग्रेस असेल किंवा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस असेल, आमच्या पध्दतीने आम्ही आमच्या प्रयत्नाने मदत केलेली आहे परंतु आपण अशी तरतूद केली तर त्यासाठी अधिकची मदत करु शकतो. या नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू पावलेल्यांना माझ्या कुटुंबातर्फे, माझ्या पक्षातर्फे आणि माझ्या संघटनेतर्फे श्रध्दांजली अर्पण करतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

श्री.दि.बा.पाटील यांच्याबाबतीत मी अधिकारवाणीने बोलण्याएवढा निश्चितच मोठा नाही. परंतु एवढेच सांगेन की, कॉलेज जीवनामध्ये स्टुडण्ट मुव्हमेण्टपासून एन.एस.यू.आय.पर्यंत मी माझ्या राजकीय चळवळीची सुरुवात केली आहे. त्या काळी महाराष्ट्रातील, देशातील काही व्यक्तिमत्वे अभ्यासण्यासारखी होती त्यामध्ये श्री.दि.बा.पाटील यांचा क्रमांक वरचा असे. सर्वसामान्य लोकांसाठी चळवळ उभी करीत असताना निरपेक्ष भावनेने ते लढत असत. हल्लीच्या काळात निरपेक्ष भावना या शब्दांचे काय झाले आहे ते आपण बघत आहोत. एक दिपस्तंभा सारखा नेता, जो उच्चशिक्षित असून सुध्दा सामान्य लोकांसाठी लढत होता. त्या काळातील उच्चशिक्षित नेत्यांनी आपापले प्रस्थ कसे उभे केले आहेत हे मी वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. त्या काळात श्री.दि.बा.पाटील यांनी वकिली करीत असताना सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकरी यांच्यावर होणाऱ्या अन्यायासाठी लढा उभा केला होता. त्यासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडलेली आहेत.

मला या ठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे की, मी 1975 साली कॉलेजमध्ये दाखल झालो होतो. त्या काळात आणीबाणीसंबंधी वृत्तपत्रांमधून रकानेच्या रकाने भरुन लिहिले जात होते. त्याकाळात आणीबाणीच्या विरोधातील अनेकजणांना अटक झाली होती. माझ्या सारख्या तरुण विद्यार्थ्याच्या मनामध्ये या सर्व गोष्ट असावयाच्या. मी 1987 सालापासून कामगार क्षेत्रात काम करीत आहे. त्यावेळेपर्यंत आणि नंतरच्या काळातही श्री.दि.बा.पाटील यांचे नाव आमच्या डोळ्यासमोर येत राहिले. त्यांचा आदर्श आमच्या डोळ्यासमोर येतो. श्री.दि.बा.पाटील यांच्या स्मृति आपल्या डोळ्यासमोर कायम राहण्यासाठी विधानपरिषदेच्या माध्यमातून काही प्रयत्न केले तर ते अधिक चांगले होईल असे मला वाटते. मी कै.दि.बा.पाटील यांच्या स्मृतीला माझ्या कुटुंबीयांतर्फे, माझ्या कामगार संघटनेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि येथेच थांबतो.

----

2....

NTK/

प्रा.फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या सदनाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सभागृहात दोन शोक प्रस्ताव मांडलेले आहेत. त्यांचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, श्री.दिनकर बाळू उर्फ दि.बा.पाटील व उत्तराखंडातील प्रलयामध्ये ज्यांनी आपला जीव गमावला आहे त्या सर्वांना श्रध्दांजली वाहण्यासाठी मी येथे उभी आहे. उत्तराखंडमध्ये भयानक घटना घडलेली आहे. यापूर्वी अशी भयानक घटना आपण कधीही बघितलेली नाही. या घटनेमध्ये अनेक वरिष्ठ नागरिक, महिला वर्ग व तरुण वर्गाचे जीव गेले आहेत. या घटनेमधून अनेक धडे शिकण्यासारखे आहेत. ज्याचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेला आहे. निसर्गाशी खेळणे बरोबर नाही. भविष्यामध्ये याची आठवण ठेवणे गरजेचे आहे. या घटनेत मनुष्यामधील वाईट प्रवृत्ती दिसून आली आहे. त्याचबरोबर मानवतेचे, शौर्याचे, बंधुत्वाचे दर्शनही आपल्याला या निमित्ताने घडलेले आहे. अनेक मुस्लीम संघटनांनी पैसे जमा करुन उत्तराखंडातील प्रलयात मरण पावलेल्या लोकांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत पाठविलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. .खंदारे 13:25

प्रा. फौजियाखान....

आपल्या देशाच्या एकात्मकतेच्या दृष्टीने हे महत्वाचे आहे.

परभणीमधील जी कुटुंबे उत्तराखंडमध्ये जाऊन परत आली त्या सर्व कुटुंबांना मी त्यांच्या घरी जाऊन भेटले. त्यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, उत्तराखंडमध्ये अडकलेल्या लोकांना वाचविण्यासाठी, त्यांची तेथून सुटका करण्यासाठी जेव्हा हेलिकॉप्टर्सची मदत घेण्यात येत होती त्यावेळी असे सांगण्यात येत होते की, महाराष्ट्रामध्ये जातीयवाद आणि प्रांतवाद असल्यामुळे त्या राज्यातील लोकांना लवकर घेऊ नये. असे अनेक अनुभव त्यांनी मला सांगितले. या निमित्ताने मला असे सांगावेसे वाटते की, बंधुत्व आणि प्रेम या पेक्षा दुसरे काहीही श्रेष्ठ नाही. भाषावाद आणि प्रांतवाद हे देशाच्या ऐकतेला हानीकारक आहेत. उत्तराखंडातील प्रलंयकारी नैसर्गिक आपत्तीतून आपण अनेक धडे घेतले पाहिजेत. मी पुन्हा एकदा उत्तराखंडातील आपत्तीमध्ये ज्यांना आपले प्राण गमवावे लागले त्यांना श्रद्धांजली अर्पण करुन थांबते.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव डावखरे (उप सभापती) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री आदरणीय श्री. अजितदादा पवार यांनी या ठिकाणी जे दोन शोक प्रस्ताव मांडलेले आहेत त्या संदर्भात माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, उत्तराखंडमध्ये जो प्रलय घडला त्यासंदर्भात सर्व माननीय सदस्यांनी या ठिकाणी भावना व्यक्त केलेल्या आहेत. उत्तराखंडातील प्रलय हा निश्चितच तुम्हा-आम्हा सर्वांनाच क्लेषदायक झालेला आहे. या आपत्तीवर अधिक न बोलता या बाबतीत काय करावयाचे यासंबंधी सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, या राज्याच्या पूरग्रस्तांकरिता या विधिमंडळाच्या माध्यमातून काही करता येईल का, त्यांना रु. 5 लाखाची - 10लाखाची मदत करता येईल का याचा विचार करावा. यासंदर्भात सन्माननीय उप मुख्यमंत्री निश्चितपणे निर्णय घेतील. तसेच इतर संकटग्रस्त राज्यांच्या मदतीला धावून जाण्याच्या बाबतीत देखील सन्माननीय श्री. अजित दादा पवार हे खंबीर भूमिका घेतील असा अशावाद मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, दुसरा शोक प्रस्ताव हा श्री. दि.बा.पाटील यांच्या संदर्भातील आहे. श्री. दि.बा.पाटील हे एक विलक्षण व्यक्तिमत्व. त्यांच्या बरोबर काम करण्याची मला देखील एकदा संधी मिळालेली होती. कल्याण मधील नागरिकांचा एक प्रश्न उपस्थित झाला होता. ग्रामपंचायतीतील काही गावे शहरामध्ये समाविष्ट केलेली होती. त्यामुळे त्यांच्यावर जे काही टॅक्सेशन लावण्यात आले होते त्यासंदर्भात श्री. दि.बा.पाटील यांनी यशस्वी असा लढा दिला होता. त्या लढ्यामध्ये काम करण्याची संधी मला त्यावेळी मिळाली होती.

त्यांच्या बाबतीत बोलत असताना मी एवढेच सांगेन की, जन्म आणि मृत्यू यांच्यामध्ये आपण जे जगतो त्याला आपण जीवन म्हणतो. एक संघर्षमय अशा प्रकारचे जीवन श्री. दि.बा.पाटील हे सदैव जगले. विधायक कार्यासाठी सदैव सकारात्मक संघर्ष करणारे, सर्वसामान्यांचे सर्वस्पर्शीय असे असामान्य नेतृत्व, असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. परमेश्वर त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो अशी मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.

---

..3..



MSS/ पूर्वी श्री. .खंदारे 13:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सदनाचे नेते आणि उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी जो दुखवट्याचा ठराव या ठिकाणी मांडलेला आहे त्यावर मी माझे विचार मांडत आहे.

उत्तराखंडामध्ये ज्या पध्दतीने नैसर्गिक आपत्ती आली अशा प्रकारची संकटे जगामध्ये फार कमी प्रमाणात येतात. या अनुषंगाने माझी शासनाला एक विनंती आहे आणि ती उप मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून करावी असे मला वाटते. मुंबईमध्ये 2005मध्ये ढगफुटी झाली होती. किमान एका महिन्यामध्ये जेवढा पाऊस पडतो तेवढा पाऊस उत्तराखंडामध्ये 10 तासामध्ये पडला आणि संपूर्ण संपून जावे अशी परिस्थिती उत्तराखंडामध्ये निर्माण झाली. त्या ठिकाणी देखील ढगफुटी झाली.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 13:30

सभापती.....

ज्याचा अंदाजही करता येणार नाही, अशा प्रकारचे मोठे नैसर्गिक संकट उत्तराखंड येथे आलेले आहे. या नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक बंधू-भगिनी अडकल्या, अनेक बंधू-भगिनी मृत्युमुखी पडल्या. या नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या बंधू-भगिनींना आज आपण श्रध्दांजली अर्पण करतो आहोत. मला असे वाटते की, या देशात असे प्रकार वारंवार घडले तर यदाकदाचित एखादा प्रलयंकारी परिणाम होण्याची सुध्दा शक्यता नाकारता येणार नाही. मला असे नमूद करावयाचे आहे की, उत्तराखंडामध्ये ज्या पध्दतीचा प्रलय झाला, अशा संकटाला तोंड देण्यासाठी देशातील प्रत्येक व्यक्ती मदत करीत असते. महाराष्ट्राने देखील आपले कर्तव्य पूर्ण केलेले आहे. यापुढच्या काळात देखील महाराष्ट्र राज्य उत्तराखंडाला मदत देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करील.

उत्तराखंडात नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी गेले होते. महाराष्ट्राचे मदतकार्य राज्यमंत्री श्री.सुरेश धस हे त्या ठिकाणी आठ ते दहा दिवस उपस्थित होते. महाराष्ट्राचे मदतकार्य राज्यमंत्री श्री.सुरेश धस यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी आहे. अशा परिस्थितीत त्या ठिकाणी वावरणे सुध्दा कठीण असते. त्या परिसरात थांबणे कठीण असते. अशा वेळी त्यांनी उत्तराखंड भागात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. आपण सर्वांनी उत्तराखंड राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी जास्तीत जास्त मदत करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्रातील अनेक यात्रेकरु तेथे दर्शनासाठी गेले होते, त्यातील अनेक यात्रेकरु मृत्युमुखी पडलेले आहेत, त्यांना आपण श्रध्दांजली अर्पण करु या.

सभागृहातील अतिशय प्रखर व्यक्तिमत्व म्हणून ज्यांच्याकडे मी जवळ जवळ 30 वर्षे पाहिले ते कै.दि.बा.पाटील हे होय. तरुण व प्रखर व्यक्तिमत्व असलेले कै.दि.बा.पाटील यांनी पहिली उडी 1942 च्या लढयामध्ये घेतली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयासाठी या जबरदस्त व्यक्तिमत्व म्हणून रायगड जिल्हयातून तरुणांची जबरदस्त मोठी ताकद उभी केली. त्यांच्यात प्रखरता किती होती हे पाहण्याचा योग मला 1983-84 मध्ये आला. 1983-84 मध्ये मी गृह राज्यमंत्री होतो. त्यावेळी सिडकोचा मोठा यज्ञ चालू होता. विस्थापितांना कोणत्या पध्दतीने संकटातून वाचवावे, त्यासाठी किती प्रखरतेने लढा द्यावा याचा विचार करुन त्यांनी त्यावेळी लढा सुरु केला होता.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

कै.दि.बा.पाटील यांच्यासारखे व्यक्तिमत्व महाराष्ट्राला सहजासहजी मिळेल असे मला वाटत नाही. मी सुध्दा एक फार मोठया प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्त लोकांचे नेतृत्व केलेले आहे. त्या अनुषंगाने बघितले तर कै.दि.बा.पाटील यांचे प्रकल्पग्रस्ताच्या बाबतीतील काम हे उज्ज्वल पध्दतीचे होते. जबरदस्त व्यक्तिमत्व असणारा, कणखरतेने राहणारा, घेतलेला निर्णय समाजाच्या ताकदीवर पुढे नेऊन आणि यशस्वी करणारा नेता म्हणून कै.दि.बा.पाटील यांना मानावे लागेल.

सिडको प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित भूखंड देण्याबाबतीत 1984 मध्ये निर्णय घेतला गेला. तो निर्णय सहजासहजी झाला नाही. एका बाजूला कै.दि.बा.पाटील यांच्या सारखे ध्येयवादी प्रखर नेते होते आणि दुसऱ्या बाजूला हाडाचे शेतकरी असणारे कै.वसंतदादा पाटील हे या राज्याचे मुख्यमंत्री होते. कै.दि.बा.पाटील यांचा रेटा आणि कै.वसंतदादा पाटील यांची भावना यातून सिडको प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित भूखंड देण्याचा निर्णय घेण्यात आला. साडेबारा टक्के विकसित भूखंड देण्याचा निर्णय शेतकऱ्यांसाठी अतिशय क्रांतीकारक ठरला आहे. या निर्णयामुळे रायगड जिल्हयातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची आर्थिक ताकद वाढली आहे. त्या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची आर्थिक ताकद ही साडेबारा टक्क्यांच्या निर्णयामुळे झाली ही खरी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .........

महाराष्ट्रातील प्रत्येक प्रकल्पाकरिता ज्यावेळी शासनाकडून जमीन संपादित केली जाते त्या जमिनीपैकी 12.5 टक्के जमीन विकसित करुन विस्थापितांना द्यायची असा जो निर्णय झाला त्याचा तो गाभा आहे. याचे संपूर्ण श्रेय स्व.दि.बा.पाटील यांनाच आहे.

त्यांनी विधानसभेमध्ये पाच वेळा, विधानपरिषदेमध्ये एक वेळा आणि लोकसभेमध्ये दोन वेळा प्रतिनिधित्व केले होते. ते पनवेलचे नगराध्यक्ष होते, लोकल बोर्डाचे सदस्य होते. जीवनातील 50 वर्षे सातत्याने स्थानिक स्वराज्य संस्थांपासून संसदेपर्यंत लोकांच्या हितासाठी ज्यांनी नेतृत्व केले त्यांना आपण श्रध्दांजली अर्पण करीत असताना माझ्या काही सन्माननीय मित्रांनी सूचना केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या माध्यमातून एक उत्कृष्ट उपक्रम कसा राबविता येईल याकरिता आपल्यासमवेत मी जरुर चर्चा करणार आहे.

उत्तराखंड राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे हजारो भाविक यात्रेकरु, भारतीय सैन्य दलातील जवान मृत्युमुखी पडले आहेत, त्यांना तसेच स्व.दि.बा.पाटील यांना श्रध्दांजली वाहण्याकरिता सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत स्व.दि.बा.पाटील यांच्या शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

-----

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.............

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 16 जुलै, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 01 वाजून 38 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 16 जुलै, 2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही